
डिटेक्टीव्ह अल्का
अंधारातील फाईल
सौरभ वागळे

# अंधारातील पाऊल

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# डिटेक्टिव्ह अल्फा

## भाग - 4

## अंधारातील पाऊल

सौरभ वागळे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

# डिटेक्टिव्ह अल्फ़ा

## **जुन्या घराचे गूढ** (रहस्यकथा)

लेखक  : सौरभ वागळे

'निसर्ग' प्लाझा, सांगलीवाडी,

सांगली.

फोन : 8983234042

ईमेल : sourabhwagale@yahoo.Com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.  तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957.  Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ३ जुलै २०१८

©esahity Pratishthan®2018

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रस्तावना**

'जुन्या घराचे गूढ' नंतर अवघ्या एका महिन्याच्या कालावधीत अल्फाचा पुढील भाग वाचकांच्या हाती ठेवू शकलो, याचा मला खूपच जास्त आनंद होतोय. अल्फा जसा वाचकांचा,तसाच माझाही जिव्हाळयाचा विषय!! त्यामुळे जसा वेळ मिळाला, तशा भराभर कल्पना कथेत उतरवल्या आणि अल्फा पुन्हा एकदा वाचकांच्या भेटीला आणला.

या सर्वात ईसाहित्यचे आभार मानावे, तितके थोडेच आहेत. मी श्री. सुनील सामंत सरांचे विशेष आभार मानू इच्छितो. कारण एक- त्यांनी अल्फासाठी उत्कृष्ट असे कव्हरपेजेस डिझाईन केले ज्यामुळे अल्फा अधिक उठून दिसला. कारण दोन - अल्फाला अधिक चांगल्या प्रकारे वाचकांपर्यंत कसे पोहोचता येईल, याबद्दल खूपच चांगले इनपुट्स दिले.अल्फाला पुढे नेण्याबद्दल वाचकांचे तर आभारच आभार!!

मागील कथेप्रमाणे हीदेखील कथा थोडी लहान आहे. पण हा भाग म्हणजे पुढच्या भागातील गहन रहस्याची नांदी आहे. त्यामुळे हा भाग वाचकांना अल्फाशी घट्ट बांधून ठेवेल, अशी माझी खात्री आहे.

आपल्या प्रतिसादाबद्दल आणि प्रेमाबद्दल मनःपूर्वक धन्यवाद!!

सौरभ वागळे

Wholeheartedly dedicated to

My MOM & DAD

अल्फाचे पहिले तीन भाग वाचले नाहीत?? खालील लिंक्स तुम्हाला ते डाऊनलोड करण्यास मदत करतील -


डिटेक्टिव्ह अल्फा भाग - 1 : रत्नजडित खंजिराचे रहस्य

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/detective_alpha_saurabh_wagale.pdf

डिटेक्टिव्ह अल्फा भाग - 2: 'देखावा'

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/detective_alpha_2_saurabh_wagle.pdf

जुन्या घराचे गूढ
http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/detective_alpha_june_ghar_saurabh_wagale.pdf






# अंधारातील पाऊल

# 1.

मार्च महिन्यात पश्चिमेचे अल्हाददायक वारे सुरू झाले आणि थंडीचा जोर ओसरू लागला. नुकतीच माझ्या कॉलेजमध्ये मिड-सेमिस्टर परिक्षा होऊन गेली होती आणि अभ्यासातून मला थोडी उसंत मिळाली होती. चौदा तारखेला, म्हणजे शुक्रवारी कॉलेजचे गॅदरींग सुरू होणार होते, जे पुढे तीन दिवस चालणार होते. गॅदरींग म्हणजे माझ्यासाठी सुट्टीच!! मला तो धागडधिंगा फारसा आवडत नसे. पहिल्यापासूनच मी अशा अवांतर गोष्टींपासून दूर राहिलो होतो (कदाचित त्यामुळेच प्रत्येक वर्षी मी क्लासचा टॉपर होऊ शकलो). माझा कॉलेज गॅदरींग बुडवून मस्त घरी जाण्याचा बेत होता. पण नेहमीप्रमाणे अल्फाने मला जबरदस्तीने सांगलीत थांबायला लावले आणि मी घरी जाण्याचा प्लॅन रद्द केला.

“तू इथे असलास, की माझा वेळ कसा जातो कळत नाही बघ प्रभू.” त्याचे ठरलेले स्टेटमेंट!!

आम्ही गुरुवारच्या रात्री जेवण झाल्यानंतर फिरायला बाहेर पडलो होतो. गेल्या तीनचार दिवसांपासून आम्ही हा कार्यक्रम सुरू केला होता. विश्रामबागचा

परिसर बऱ्यापैकी मोकळाढाकळा होता. रात्री दहानंतर तेथे फारशी रहदारी नसायची. अशा शांत वातावरणात छानपैकी वारं सुटलेलं असायचं. मग आम्ही फिरायला बाहेर पडायचो. मला फार अभ्यास नसेल तर आम्ही कधीकधी चक्क बारा वाजता रूमवर परतायचो. दिवसाचा हा भाग मला फार आवडायचा. अल्फाशी बोलताना मी कधीच कंटाळत नाही, त्यामुळेच मी त्याचा घरी न जाता त्याच्यासोबत राहण्याचा आग्रह डावलू शकायचो नाही.

“तू रूमवर रहायला यायच्या आधी मला एकटं रहायची सवय लागली होती. माझं बोलण्यास उत्सुक असलेलं तोंड तेव्हा मला बळजबरीने बंद ठेवावं लागायचं. पण तू आल्यानंतर मला माझी बडबड ऐकवायला एक आयताच बकरा मिळाला. आणि तूपण अगदी साधूसारखा शांत चित्ताने माझी सगळी बडबड ऐकून घेतोस. त्यामुळे आता तू  घरी गेलास, की मला एकट्याला अगदीच घुसमटल्यासारखं होतं. तू नसलास की मी एक सुस्त,आळशी व्यक्ती बनतो.”

अल्फाच्या त्या बोलण्यावर मी हसलो.

“ 'आळशी व्यक्ती बनतो' या तुझ्या विधानाला काही अर्थ नाहीये बरं का अल्फा. मी असलो तरीही तू एक आळशी व्यक्तीच असतोस!!”

“बरं.. 'जास्तच' आळशी व्यक्ती बनतो असं म्हण..” मी त्याला शब्दांत पकडलंय, हे त्याच्या लक्षात आलं, “ कसं असतं ना हे सगळं.. मला तर आपलं आयुष्य म्हणजे एखाद्या नदीसारखं वाटतं बघ. उगमाच्या ठिकाणी ते जन्म घेतं आणि मग त्याचा पुढच्या दिशेने प्रवास सुरू होतो. वाटेत शेकडो हजारो माणसे

भेटतात, आई, वडील, नातेवाईक, मित्र.. आणि प्रत्येक व्यक्तिगणिक त्याचा प्रवाह रुंदावत जातो. ते हळूहळू मोठे होत जाते. शरीराने आणि मनानेही. आणि त्याला मोठे कोण करतात, तर हेच त्याला वाटेत भेटणारे लोक. ते आपल्याकडे येतात आणि आपल्यातच मिसळून जातात. पहा ना, एखाद्या व्यक्तिसोबत तू जर आयुष्याचा काही काळ व्यतित केलास, मग तो चांगला असो किंवा वाईट, त्याच्या आठवणी आयुष्याच्या शेवटापर्यंत तुझा एक अविभाज्य भाग बनतात, प्रवाहासारख्या. नदीतून जसा एकदा मिळालेला प्रवाह परत बाहेर पडत नाही, तशा आठवणी आपल्या डोक्यातून कधीच बाहेर पडू शकत नाहीत. फक्त विस्मरणात जातात काही काळासाठी.. आपली साथही तशीच. दोन भिन्न प्रवाह येऊन मिळालेत आणि आता ते आयुष्यभरासाठी आठवणी निर्माण करताहेत. छान आहे नाही का हे??”

“होय.. खरंच..” मीही भावनांच्या ओघात वाहू लागलो. मी सांगलीमध्ये पाऊल ठेवेपर्यंत कधी कल्पनाही केली नव्हती, की मी एका विक्षिप्त बडबड्या मुलासोबत एकाच खोलीमध्ये राहू शकेन, अॅडव्हेंचरस असे काही करेन आणि चक्क गुन्हेगार लोकांना पकडण्यात कोणाच्या उपयोगी पडेन. पण आता अल्फाची एवढी सवय लागली होती, की रात्री त्याची टकळी ऐकल्याशिवाय झोपच यायची नाही. आम्ही रूमवर सतत गप्पा मारत असायचो (मी आजपर्यंत ज्याच्याशी सर्वात जास्त बोललो असेन, तो निश्चितपणे अल्फाच असेल!!). त्यामुळे घरी गेल्यानंतर लोक एकदम कमी बोलताहेत, असं मला वाटू लागायचं.

रात्रीचे बारा वाजून गेले आणि आम्ही रूमकडे जाण्यासाठी परत फिरलो. शंभर फूटी रस्ता सताड रिकामा झाला होता आणि रस्त्यावरील दिव्यांच्या फिकट प्रकाशात आम्हाला पायांत सरकणाऱ्या आमच्या सावल्या दिसत होत्या.

“जरा जास्तच लांब आलो आज आपण, नाही का??” अल्फा म्हणाला. खरंच विचार करता करता आम्ही बरेच लांब आलो होतो. तरी आम्ही मुख्य रस्त्यावरून चालत होतो म्हणून नशीब!! इथे एखाद दुसरं वाहन अधूनमधून येत जात तरी होतं. नाहीतर ती शांतता फारच भयाण वाटली असती.

“दिवसभर गजबजलेला हा रस्ता रात्री एवढा निर्मनुष्य होत असेल, यावर पटकन विश्वास बसत नाही.” मी म्हणालो.

“अगदीच निर्मनुष्य होतो असं नाही.. रात्री इथे काही खास लोकांचं राज्य असतं.” अल्फा मिश्कीलपणे म्हणाला. लांबून एक माणूस रस्त्याच्या कडेला बसलेला आम्हाला दिसला. तो आपल्याच धुंदीत काहीतरी बडबडत होता.

“दारुडे आणि वेडे!!” मी मान हलवत म्हणालो. तो रस्त्याच्या बाजूला बसला होता. आम्ही जवळ जाऊ तसा त्याचा आवाज मोठा मोठा होत होता, “ हे महाशय नवीनच दिसतायत या राज्यात.. !! आधी तरी या भागात कधी पाहिले नाहीये याला.”

“हो, खरंय.” अल्फाने मला दुजोरा दिला, “ वेडा दिसतोय कोणीतरी हा..”

“राक्षस.. भयानक राक्षस..” त्याचे बोलणे आम्हाला ऐकू येत होते, “ त्याने मारून टाकले.. खून केला.. जाळून टाकले!! खूनी आहे तो..”

अल्फा आणि मी विचित्र नजरेने एकमेकांकडे पाहिले.

“राक्षस परत येणार आहे.. तो मला मारून टाकणार आहे.. . तो सर्वांना मारून टाकणार आहे!!” त्याची नजर आमच्याकडे गेली. तो एकदम उठून आमच्या दिशेने आला. माझ्या छातीत धस्सच झाले.

“तुम्ही.. तुम्हीपण मरणार आहे!!” त्याने आमच्याकडे बोट दाखवले, “ तो कुणालाच सोडत नाही. तो जाळून टाकतो.. . तो मारून टाकतो.. . मी पाहिलंय त्याला मारताना.. खूनी आहे तो.. . !!”

आम्ही मागे सरकलो. अल्फा मात्र सावधपणे त्याच्याकडे पाहत होता.

“कोण आहेस तू?? आणि कुणाला पाहिलंयस तू मारताना??” त्याने विचारले. ते ऐकताच तो अचानक बिचकला. मान डोलवत तो मागे मागे सरकू लागला.

“नाही.. नाही..” तो थरथर कापत होता, “ मला ठाऊक नाही.. म्.. मला.. माहित नाही.. !!” तो मागे दगडात धडपडला.

“आम्ही तुझी मदत करायला आलोय. घाबरू नकोस, थांब..” अल्फा हळूवार त्याच्या दिशेने पुढे झाला. पण तो परत उठला आणि आमच्यापासून दूर धावू लागला.

“नाही.. दूर जा.. जीव वाचवा.. पळून जा!!” ओरडतच तो पळत गेला आणि मिनिटभरातच दिसेनासा झाला. मी दूर जाणाऱ्या त्याच्या आकृतीकडे आणि त्याच्याकडे बारीक नजरेने पाहणाऱ्या अल्फाकडे पाहत होतो. अल्फा विचारमग्न होऊन त्या दिशेने पाहत होता.

“तो एक वेडा आहे अल्फा.” मी समजावणीच्या सुरात म्हणालो, “ काहीतरी चित्रविचित्र बोलणारच तो. एवढा कशाला विचार करातोस??”

“तो म्हणाला की त्याने कोणालातरी खून करताना पाहिलंय.. .” अल्फा म्हणाला.

“तुला काय वाटतं, त्याच्या बोलण्यात काही तथ्य असावे का??”

“माहीत नाही.” अल्फा म्हणाला, “ त्याने काहीतरी भयानक पाहिलं असावं आणि त्यामुळे तो वेडा झाला असावा, किंवा तो वेडा आहे म्हणूनच असं काहीतरी भयानक पाहिल्यासारखं बोलत असावा.. . किंवा असंही असेल, की. .”

त्याने थोडासा विचार केला आणि मग एकदम मान झटकली, “ मी या निरर्थक गोष्टीचा उगाचच विचार करत असेन!! चल, जाऊया रूमवर!!”

'रूमवर जाऊया ' असे अल्फाने म्हणताच मी मनातल्या मनात सुखावलो. मला जाम झोप येत होती आणि अल्फाने जर त्या वेड्याचा पाठलाग वगैरे करण्याचा बेत केला असता, तर माझ्यावर मोठीच नामुष्की ओढवली असती. आम्ही रूमच्या दिशेने चालू लागलो.

“मला ना प्रभू, एखादे रहस्य समोर उभे राहतेय अशी जाणीव जरी झाली, तरी एकदम हुरूप येतो. मग डोक्यात अशी शक्यतांची साखळी बनायला लागते आणि ती गोष्ट सोडून दुसरे काही सुचतच नाही. पण मी एखाद्या गोष्टीत खूप डोकं लावलं आणि शेवटी त्यातून फुसकुंडं काहीतरी निष्पन्न झालं, असं बऱ्याचदा झालंय याआधी. मग शेवटी वाटतं की फुकटच बुद्धी खर्ची घातली मी यामध्ये!! “

“व्हेरी गुड!!” मी उद्गारलो, “ मग ही केसदेखील आपण त्याच लिस्टमध्ये टाकूया, त्या वेड्याचे भले होवो अशी प्रार्थना करूया आणि वरती जाऊन मस्त ताणून देऊया!!”

“देअर यू गो!!” अल्फा हसला आणि आम्ही तो विषय तेथेच संपवून टाकला.. !!

*

# 2.

दोन - तीन दिवस गेले आणि रविवार उजाडला. कॉलेजच्या गॅदरींगचा आणि पर्यायाने माझ्या सुट्टीचा शेवटचा दिवस!! दोन दिवस कसे गेले कळालंच नाही. मला सुट्टीच्या दिवसांत जे काही करायचं होतं, त्यातलं बरंचसं मी शनिवापर्यंत करून टाकलं होतं. पुढील महिन्यात असणाऱ्या परीक्षेसाठी थोडं पुस्तक घेऊन बसलो. शिवाय मेकॅनिकल इंजिनिअरिंगची लायब्ररीतुन आणलेली काही रेफरन्स बुक्सही वाचून काढली. रविवारी सकाळी माझी झोप उघडली तेव्हा सूर्य चांगलाच वर आला होता. मी डोळे किलकिले करून घड्याळाकडे पाहिले. पावणेनऊ वाजायला आले होते. आजही कॉलेजला जायचे नाहीये, हा विचार मनात येताच मी जाम खुश झालो आणि काही वेळ तसाच बेडवर लोळत पडलो. सकाळी जाग येताच दिवसभर आपल्याला काहीच काम नाहीये अशी जाणीव होणे यापेक्षा मोठे सुख कोणते असूच शकत नाही, मी विचार केला. अल्फा म्हणत होता, की कुणाचीतरी बाईक मिळवूया आणि कुठेतरी दूर भटकून येऊया. मला त्यावर हरकत घेण्याचे काहीच कारण नव्हते. तसंही पुस्तक डोळ्यासमोर ठेवून ठेवून मी पकलो

होतो. माझ्या क्लासमध्ये कोणाकडे गाडी आहे का, याचा विचार करत मी बेडवर उठून बसलो.

“उठलास प्रभू?? वा वा वा.. चल आता पटकन आवर आणि इथे माझ्या समोरच्या खुर्चीवर येऊन बस.” अल्फा त्याच्या नेहमीच्या खिडकीजवळील खुर्चीत बस्तान मांडून बसला होता. त्याच्या हातात छोटी डायरी आणि पेन पाहून मला आश्चर्य वाटले. कारण ती डायरी तो त्याच्या तपासकामातील नोंदी लिहायला वापरायचा.

“हो हो.. थांब. आजच्यासाठी गाडी लागणारे आणि मला समोर बसवून तू माझ्या मित्रांना फोन करायला लावणारेस, हे मला ठाऊक आहे. डोन्ट वरी!! गाडी मिळेल आपल्याला.” मी आळोखेपिळोखे देत म्हणालो, “ तू आपल्याला कुठे जायचंय, ते ठरव ना आधी.. ती डायरी काय घेऊन बसलायस!! फिरायला गेल्यावर हेरगिरी नाहीये करायची आपल्याला!!”

“हो बरोबर आहे तुझं. फिरायला गेल्यावर हेरगिरी करायची नाहीये.” अल्फा डोळे बारीक करत म्हणाला, “ फिरायला न जाता हेरगिरी करायचीये!!”

मी ब्रश आणायला बेसिनकडे निघालो होतो, पण अल्फाचे ते वाक्य ऐकून जागीच थबकलो.

"असा लूक देऊ नकोस मला.. ब्रश करून ये पाहू लवकर.. तुझ्याशी बोलण्यासाठी एक खमंग विषय मिळालाय मला!!" अल्फा हातांवर हात चोळत म्हणाला. त्याच्या डोळयांतील ती चमक माझ्या चांगलीच ओळखीची होती.

"बरं, आलो." मी एक दिर्घ उसासा टाकत बोललो. आजच्या बाईक ट्रिपचा बट्ट्याबोळ झालाय, हे उघडच होते.

माझे दात घासून झाले आणि मी अल्फाच्या समोरील खुर्चीवर जाऊन बसलो.

"झालं?? गुड. आता हे वाच." त्याने 'पोलीस टाईम्स' ची मोबाईलवर उघडलेली ताजी न्यूज मला दाखवली. मी सांगली जिल्ह्याच्या पेजवरील हेडलाईन वाचली,

*'काळया खणीच्या तळयात सापडले एका अज्ञात पुरुषाचे प्रेत '*

*सांगली वृ. : आज (दि. 15 मार्च) रोजी रात्री उशिरा सांगलीतील काळया खणीच्या तळयात एका अज्ञात पुरूषाचे प्रेत पाण्यावर तरंगताना लोकांनी पाहिले. स्थानिकांनी तातडीने पोलिसांना फोन केला आणि ते प्रेत बाहेर काढण्यात यश मिळविले. ते प्रेत अंदाजे पन्नास वर्षांच्या पुरुषाचे असून त्याची ओळख पटविण्यात अजून पोलिसांना यश आलेले नाही. प्राथमिक अंदाजानुसार या व्यक्तिचा मृत्यू एक दिवस आधी, म्हणजे शुक्रवारी (ता. 14 मार्च) रोजी झाला असण्याची शक्यता आहे. या व्यक्तिच्या अंगावर कोठेही जखम झाल्याचे आढळून आलेले नाही. त्यामुळे याचा मृत्यू पाण्यात बुडून झाला आहे, हे स्पष्ट आहे. घटनास्थळी पोलीसांनी तपासणी*

*केली आहे, पण त्यातून काहीही निष्पन्न झालेले नाही. दृश्य गोष्टींवरून त्या व्यक्तिने पाण्यात उडी मारून आत्महत्या केली असावी, असे अनुमान पोलिसांकडून बांधले जात आहेत. सध्या या व्यक्तीची ओळख पटविण्याचे प्रयत्न चालू आहेत. या प्रकरणावर सांगली जिल्हा पोलीस खात्यातील इन्स्पेक्टर देसाई काम करत आहेत.*

या वृत्ताच्या बाजूलाच एका सुरकुतलेल्या चेहऱ्याच्या , काळी - पांढरी संमिश्र अशी मोठी दाढी असलेल्या, भटक्या दिसणाऱ्या एका माणसाचा फोटो होता. तो फोटो पाहून मी क्षणभर जागीच गोठून गेलो!! हा तोच होता - दोन दिवसांपूर्वी आम्हाला रात्री उशिरा रस्त्यावर भेटलेला वेडा.. !!

ते वाचून होताच मी अल्फाकडे पाहिले. तो एक भुवई वरखाली करत आणि गालातल्या गालात हलकेच स्मित करत माझ्याकडे पाहत होता. मी एक मोठा श्वास घेतला.

“तर तुला म्हणायचंय, की या प्रकरणात काहीतरी काळंबेरं आहे..” मी म्हणालो.

“शंकाच नाही प्रभू!! अगदी दोनशेदोन टक्के यात खोल पाणी मुरलेलं आहे.”अल्फा खुर्चीवर हात आपटत म्हणाला,” मी खात्रीशीरपणे सांगू शकतो, की त्या वेड्याला नक्कीच काहीतरी गुपित ठाऊक होतं. काहीतरी म्हणण्यापेक्षा आपण 'कुणाचंतरी' असं म्हणूया. आणि तो जो कोण होता, त्याने या वेड्याचा तोंड उघडण्याआधीच खेळ संपवून टाकलाय.”

"तू हे इतक्या ठामपणे कसं काय सांगू शकतोस??" मी साशंकतेने विचारले, " मला म्हणायचंय, की हा एक योगायोगही असू शकतो ना.. आपण त्याला पाहणं आणि त्यानंतर दोन दिवसांत त्याचा मृत्यू होणं. त्यानं कोणालाही खून करताना पाहिलं असलं तरी शेवटी तो एक  वेडा होता. त्यामुळे तो काहीही बोलला तरी ते लोकांना पटणारच नाही. त्यामुळे त्याच्यापासून कोणत्याही खुन्याला धोका उद्भवणार नाही. आणि म्हणूनच, त्याला ठार मारण्याचा कोणी प्रयत्नही करणार नाही!!"

अल्फाची क्षणभर चलबिचल झाली. ते पाहून मी स्वतःवरच जाम खुश झालो. अशी पटण्यासारखी स्पष्टीकरणं मला क्वचितच देता यायची. अल्फाने थोडासा विचार केला आणि मग तो म्हणाला,

"हे पहा प्रभू, मी हे मान्य करतो, की एखादा वेडा मनुष्य काहीतरी बडबडत असेल, तर ती गोष्ट म्हणजे आपल्यासाठी निव्वळ कचरा असतो. पण कदाचित त्या व्यक्तीसाठी त्याला काहीतरी अर्थ असावा. आता तूच बघ ना. तुझ्या माझ्यासारखे डोकं ताळ्यावर असलेले लोक दिवसभरात बहुतांश कशाबद्दल बोलतात? आपण रोज जे आयुष्य जगत असतो, त्याबद्दल. पण हे जे मनोरुग्ण असतात ना, त्यांच्या आयुष्यात काहीतरी भयंकर घटना घडलेली असते, ज्यातून ते बाहेरच येऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्यासाठी ती घटना हेच भूत, वर्तमान आणि भविष्य होऊन बसतं. त्यांना वाटतं, की ती घटना अजूनही घडतेच आहे आणि त्यामुळे त्याला अनुसरून ते काहीतरी बोलतात. आता ही व्यक्ती खूनाबद्दल काहीतरी बरळत होती, याचा अर्थ तिने त्याच्या आयुष्यात जवळच्या कोणाचातरी

खून होताना पाहिलं असण्याची शक्यता आहे, असा होत नाही का?? आणि ते गुपित बाहेर पडू नये, म्हणून त्यालाही कोणीतरी मारून टाकले असावे.”

अल्फाचे स्पष्टीकरण अमान्य करण्यासाठी त्याने मला जागाच ठेवली नव्हती.

“नाही प्रभू.. माझ्या शोधक बुद्धीला हे क्षुल्लक काहीतरी असेल, हे पटत नाहीये. मला वाटतंय, की यात एकदा डोकावून पाहयलाच हवंय..

“बरं बरं.” मी म्हणालो, “ मला ठाऊक आहे, की तू या वेडपट माणसाच्या मृत्यूचा शोध घेतल्याशिवाय राहणार नाहीस आणि त्यावरून मी हाही निष्कर्ष काढून ठेवला आहे, की आजची आपली बाईक ट्रिप रद्द झालेली आहे. त्यामुळे मिस्टर डिटेक्टिव्ह, आता पुढे काय करायचं आहे, हे तुम्ही सांगा..”

“शाब्बास.. फारच छान!! अशी आपल्या हातात सुत्रे आली, की कसं झकास वाटतं..” अल्फा हसत म्हणाला. त्याच्यामध्ये असलेला 'अल्फा स्पेशल' उत्साह परत वर उफाळून आलेला मला स्पष्ट जाणवत होता. त्याला एका न उलगडलेल्या कोड्याची चाहूल लागली होती आणि ते कोडे सोडविल्याशिवाय त्याच्यातला डिटेक्टिव्ह आता शांत बसणार नव्हता.

“आता मला थोडा वेळ दे.. मी आधी घडलेल्या घटनांचा आढावा घेतो आणि मग आज काय काय काम करायचे, याची रुपरेषा आखतो.”तो खुर्चीतून उठला आणि त्याने रुममध्ये येरझाऱ्या घालण्यास सुरुवात केली. मी मस्त जांभई देत डोळयांवर पुन्हा झोप येतेय का, याचा अंदाज घेऊ लागलो.

“ठिकाय.” अल्फा म्हणाला, “ सध्या आपल्याकडे 'तो एक वेडा होता, त्याने कोणालातरी खून करताना पाहिले होते आणि त्यामुळे त्याचा खून झाला' एवढीच माहिती आहे. आता आपण तीन ठिकाणांना भेट देणे अनिवार्य आहे -पहिलं पोलीस ठाणे, जिथे इन्स्पेक्टर देसाई बसतात, दुसरं म्हणजे शवागार, जिथे त्या वेड्याचं प्रेत ठेवलं आहे आणि तिसरं म्हणजे काळया खणीचे तळे, जिथे ही घटना घडली आहे. गाडी तर आपल्याला मिळणार आहेच. तिचा आज चांगला उपयोग होईल, असे मला वाटतेय.”

“आणि या सर्वाआधी आणखी एका ठिकाणी जायचंय - ते म्हणजे विश्रामबाग चौकातले गणेश नाश्ता सेंटर!!” मी गुरगुरणाऱ्या पोटावर हात ठेवत म्हणालो!!

गणेश नाश्ता सेंटर म्हणजे आमच्या रूमपासून सर्वात जवळ असलेले स्वस्तात मस्त खाण्याचे ठिकाण होते. एका अस्सल मराठी माणसासारखा पोहे आणि चहा असा ब्रेकफास्ट आम्ही केला. बाईक ट्रिपच्या निमित्ताने मिळालेली टू व्हीलर आमच्याकडे होतीच. ती घेऊन मग आम्ही जिल्हा पोलीस ठाण्याकडे निघालो. इन्स्पेक्टर देसाई तेथून बाहेर पडायच्या बेतातच होते, तेवढ्यात आम्ही त्यांना गाठले.

“सर आत येऊ का?” आम्ही त्यांच्या केबिनच्या दारातून त्यांना विचारले. ते आपल्या हातातील फाईल्स बाजूला ठेवत होते. आमचा आवाज येताच त्यांनी आमच्या दिशेने पाहिले.

“कोण तुम्ही??” त्यांनी गुरकावून विचारले. ते निघण्याच्या वेळी आमचं तिथे जाणं म्हणजे नवीन ब्याद समोर येण्याची शक्यता, असा त्यांचा समज झाला असावा.

“मी अल्फा. आणि हा माझा मित्र प्रभव.”

अल्फा हे नाव ऐकताच देसाईंच्या चेहऱ्यावरील प्रश्नार्थक भाव जाऊन त्रासलेले भाव आले.

“अरे देवा!! तू तोच अल्फा आहेस का, ज्याच्या नावाने वाघमारे सर सतत शंख करत असतात??” त्यांनी विचारले.

“वाघमारे सर जर शंख करत असतील, तर ती व्यक्ती निःशंकपणे मीच आहे!!” अल्फा हसत म्हणाला.

“हे बघ अल्फा बीटा गॅमा जे काय ते, मी आता निघालोय कारण आज सुटीचा दिवस आहे. सर्वत्र शांततापूर्ण वातावरण आहे आणि पोलिसांना आज काहीच काम नाहीये. असा दिवस एखाद्या पोलिसाच्या आयुष्यात क्वचितच येत असतो. त्यामुळे तू माझ्यामागे कोणतेही लचांड लावू नयेस, असं मला वाटतं.. तू मस्तपैकी उद्या सकाळी ये पाहू..”

“निघाला आहात? पण आत्ता तर काम सुरू होण्याची वेळ आहे सर.. !!” अल्फा म्हणाला.

“हो का? मग या फाईल्स घे आणि तूच काम कर माझ्याऐवजी!!” त्यांनी टोला लगावला.

“सर माझं फक्त पाचच मिनिटांचं काम आहे. तुमच्या मागे कोणतंही काम लागणार नाही, याची ग्वाही मी देतो. बरोबर पाच मिनिटांनी तुम्ही या ऑफिसच्या बाहेर असाल. फक्त मला तुमची पाच मिनिटे द्या..” अल्फा म्हणाला. देसाईंनी थोडा विचार केला आणि ते म्हणाले, “ बरं. बरोब्बर पाच मिनिटं. बोला. काय हवंय तुम्हाला??”

“मला तुम्हाला काल काळया खणीच्या तळयात सापडलेल्या प्रेताबद्दल तुम्हाला काहीतरी सांगायचंय.”

“काळया खणीच्या तळयात काल सापडलेलं पुरूषाचं प्रेत??” त्यांनी निर्विकारपणे विचारले.

“होय.” अल्फा काही बोलणार, तेवढ्यात ते म्हणाले,

“त्या घटनेची पूर्ण माहिती आम्ही मिळविली आहे. ती एक साधी आत्यहत्येची केस आहे. मृत इसम हा एक मेंटल पेशंट होता आणि तो मिरजेतील मनोरुग्णांच्या हॉस्पिटलमधून पळून आलेला होता. त्याने याआधी हॉस्पिटलमध्ये असतानादेखील दोनतीनदा आत्महत्येचा प्रयत्न केला होता. त्याने काल रात्री खणीच्या तळयात उडी मारून आपला जीव दिला. आम्ही ही केस क्लोज करून

डेडबॉडी हॉस्पिटलच्या हवाली करणार आहोत. त्यामुळे हा विषय सोडून दुसरे काही बोलायचे असेल तर बोला. अन्यथा निघा."

"मला माणूस तीन दिवसांपूर्वी भेटला होता "अल्फा शांतपणे म्हणाला, "आणि त्यावेळी त्याने मला असे काहीतरी सांगितले आहे, ज्यावरून मला वाटते, की या प्रकरणाचा थोडा खोलात जाऊन तपास व्हायला हवा."

देसाईंनी त्यांचे डोळे बारीक केले.

"कुठे भेटला होता तो तुम्हाला?? आणि काय सांगितले त्याने तुम्हाला??" त्यांनी विचारले.

"शंभर फूटी रस्त्यावर. तो आमच्याशी बोलला. तो म्हणत होता, की त्याने कोणालातरी खून करताना पाहिले आहे.." अल्फा संथपणे म्हणाला. ते ऐकताच क्षणात देसाईंचा चेहरा गंभीर झाला.

"काय?? खून??"

"होय." अल्फा उत्तरला.

"तुम्हाला नक्की खात्री आहे, तो हाच होता याची??"

"हो, शंभर टक्के!! दोन दिवसांपूर्वी पाहिलेला चेहरा कोण विसरेल बरं??" अल्फा म्हणाला.

“काय म्हणाला तो? मला सविस्तर सांगा जरा.” खुर्चीवरून पुढे झुकत ते म्हणाले.

“आम्ही गुरुवारच्या रात्री जेवण झाल्यानंतर शंभर फूटी रस्त्यावर नेहमीप्रमाणे फिरायला बाहेर पडलो होतो तेव्हा आम्हाला हा मनुष्य भेटला होता. तो एकदम सैरभैर झाला होता आणि सतत म्हणत होता, की त्याने कोणालातरी खून करताना पाहिलंय आणि आता तो त्यालाही मारणार आहे. आम्ही त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला, पण तो खूप घाबरलेला होता. त्यामुळे त्याने आम्हाला काहीच सांगितले नाही. शेवटी आम्ही प्रयत्न सोडून दिला आणि आमच्या रूमवर परतलो. त्यानंतर आज सकाळी याचा फोटो पेपरमध्ये पाहिला आणि तुमच्याकडे आलो.”

“हं..” देसाई विचारांत मग्न झाले, “ पण तो एक वेडा होता, हे विसरून चालणार नाही. तो काही निरर्थक बोलत नसेल कशावरून??”

“पण तो निरर्थक बोलत असेलच, असेही आपण नाही म्हणू शकत ना.. कदाचित त्याच्या बोलण्यात काहीतरी तथ्य असेलही.”

“मला या सगळ्याचा नक्की काय अर्थ लावायचा, हेच कळेनासं झालंय. तुम्हाला असं म्हणायचं आहे का, की त्याचा खून करण्यात आलाय??”

“ठाऊक नाही. पण या प्रकरणाचा थोडा आणखी अभ्यास करायला हवा , असं मला वाटतं. शिवाय मलाही यात काही मदत करता आली, तर फार बरं होईल.”

“अच्छा..” देसाईंनी थोडं डोकं खाजवलं, “ वाघमारे सर म्हणतात, की तू कामात फार लुडबुड करतोस. पण अगदीच निकामी नाहीयेस तू. बरं. हरकत नाही. तुला या प्रकरणाच्या तपासातील सगळया गोष्टी खुल्या आहेत. तुला हवी ती मदत तू करू शकतोस. कोणी विचारलं, तर माझं नाव सांग आणि काही लागलं, तर फोन कर. हे माझं कार्ड. आपण आणखी चौकशी करू यामध्ये. बरं आता मला साहेबांचा फोन यायच्या आत आपण निघूया का??”

त्यांनी सगळया गोष्टी एकदमच गुंडाळून टाकल्या.

“हो हो. धन्यवाद सर!!” अल्फा  खूश होऊन म्हणाला, “ आणखी एकच गोष्ट.. त्या व्यक्तिच्या डेडबॉडीचे फॉरेन्सिक पोस्ट मॉर्टम करावे, अशी माझी मागणी आहे.”

“बरं बरं ठिक आहे.. उठा आता..” आम्ही तेथून उठत होतोच, इतक्यात देसाईंच्या समोरचा फोन वाजला - हेड ऑफिस!!

“सत्यानाश!!” त्यांनी आमच्याकडे खाऊ की गिळू अशा नजरेने पाहिले आणि फोन उचलला,

“येस सर!!”

“चल पळ लवकर, त्यांनी फोन ठेवायच्या आत!!” अल्फा मला ढकलत म्हणाला. आम्ही धावतच बाहेर आलो आणि एकमेकांच्याकडे पाहून हसलो.

“अल्फा, देसाईंचा सन्डे बरबाद करून टाकलास तू!!” मी हसू आवरत म्हणालो.

“बिचारे!!” अल्फा म्हणाला, “ आता पुन्हा त्यांच्या समोर जायला जागाच उरली नाही!! असो. आपण आपल्या कामाला लागू. प्रथम आपल्याला त्या माणसाच्या वस्तू पहायच्या आहेत.”

आम्ही तेथील संग्रहित वस्तूंच्या कक्षात गेलो.

“आम्हाला देसाईसाहेबांनी पाठवलं आहे. काल रात्री काळया खणीच्या तळयात मिळालेल्या प्रेताचे कपडे आणि चपला पहायच्या आहेत.” अल्फा तेथील हवालदारांना म्हणाला. हवालदारांनी मान डोलावली आणि त्याचे कपडे आणि चपला यांच्या पिशव्या दाखवल्या.

अल्फाने प्रथम त्याचे कपडे हातात घेतले. ते कपडे आम्ही त्या रात्री पाहिले तेच होते. रुग्णालयात रूग्णांना देतात, तसे पांढरे, पण आता पिवळट पडलेले असे ते कपडे होते. अल्फाने शर्टाच्या बाह्या, कॉलर, पँटेचे गुडघे, तळ सर्वांचे त्याच्या भिंगाखालून निरीक्षण केले. शर्टामध्ये त्याला काही सूचक दिसले असावे ; कारण त्याने शर्टाचे फोटो काढून घेतले. मग ते पुन्हा पिशवीत ठेवून दिले.

मग त्याने आपला मोर्चा चपलांकडे वळवला. चपला म्हणजे अगदी साधे असे स्लीपरच होते ते. पाण्यात पडल्यामुळे त्या थोड्या स्वच्छ झाल्या होत्या. त्यातील एका चपलेवर त्याचे लक्ष बराच वेळ केंद्रीत झाले होते. त्याने ती चप्पल टेबलावर पालथी ठेवली. तिच्याकडे सर्व बाजूंनी नीट निरखून पाहिले. मग खिशातून भिंग काढून अगदी जवळून न्याहाळले. तिच्या तळव्याचा वास घेतला. त्याचे मोबाईलमध्ये फोटो काढून घेतले आणि सरतेशेवटी तो म्हणाला,

“या चपला मिळाल्यानंतर त्यावर कोणी काही प्रयोग केलेले नाहीयेत ना?? त्या होत्या त्याच अवस्थेत या पिशवीत ठेवलेल्या आहेत ना??”

“होय. त्या घेऊन कोण काय करणार!! मिळाल्या तशा या पिशवीत ठेवल्यात.” हवालदार उत्तरले.

“अच्छा..” अल्फा म्हणाला. त्याचे मन खूपच खोल विचारांत गढून गेले होते, असे त्याचा चेहरा सांगत होता. शेवटी तो  मनातल्या मनात एका निकालावर येऊन पोहोचला आणि म्हणाला,

“मला या चपलांवरचे आणि शर्टावरचे फिंगरप्रिंट्स हवेत. शक्य तितक्या लवकर.”

“चपलांवरचे फिंगरप्रिंट्स??” हवालदार चक्रावलेच.

“होय. मला या प्रकरणात लागेल ती मदत देण्याचे देसाई साहेबांनी मान्य केले आहे. तुम्हाला काही शंका असेल, तर तुम्ही देसाई सरांना फोन लावू शकता.”

हवालदार महाशयांनी आपल्याला कोणी तिऱ्हाईत येऊन काम सांगतंय, याबद्दल नाखुशी व्यक्त केली ; पण अल्फाला फिंगरप्रिंट्स देण्याचे मान्य केले. अखेर त्यांचे आभार मानून आम्ही पोलीस ठाण्याच्या आवाराबाहेर पडलो.

“त्या शर्टात आणि  चपलेत तू काहीतरी खास पाहिलंयस, हो ना??” मी अल्फाला विचारले. तो अजूनही त्याच्याच तंद्रीत होता.

“चल, शवागाराकडे जाऊ.” तो म्हणाला. माझा प्रश्न बहुधा त्याने ऐकलाच नसावा. मी खांदे उडवले आणि गाडीला किल्ली लावली.

*

# 3.

अल्फासोबत राहून मी आयुष्यात कधी कल्पनाही करणार नाही, असे अनुभव गेल्या आठ-दहा महिन्यात घेतले होते. आजचा शवागार पाहण्याचा अनुभव हा त्याच यादीतला पुढचा!! सिव्हिल हॉस्पिटलच्या मागील बाजूस हा विभाग होता. आम्ही देसाईंचे नाव सांगताच आम्हाला आत जाण्यास परवानगी मिळाली. सोबत तिथला ऑपरेटर होता. आत शिरताच मला माझे रक्त गोठते की काय असे क्षणभर वाटून गेले. तेथील थंड वातावरण, मरणप्राय शांतता आणि हवेतील उदासीनता तेथे असलेल्या मृत शरीरांच्या अस्तित्वाची जाणीवच करून देत होते. तेथे मोठी कपाटे होती, ज्यांमध्ये अतिशीत तापमानात मृत शरीरे निपचित पडली होती. ऑपरेटरने आम्ही सांगितलेल्या व्यक्तीचा ड्रॉवर नंबर पाहिला आणि त्या कपाटाच्या दिशेने आम्हाला तो घेऊन गेला. मी सबंध वेळ जीव मुठीत धरूनच होतो. त्याने त्या कपाटाच्या कप्पा सरकवला. आतमधील बॉडी बाहेर आली आणि त्यासोबत तेथे वापरल्या जाणाऱ्या केमिकलचा उग्र वास आमच्या नाकात शिरला.

अल्फाने त्या बॉडीवर झाकलेले कापड हटवायला सांगितले. ऑपरेटरने तसे करताच मला तो ओळखीचा चेहरा दिसला.

त्याचा चेहरा भावहीन होता. शरीर निश्चल होते. अल्फाने त्याला पाहताच हातात हँडग्लोव्हज घातले आणि तो त्या शरीराची बारकाईने तपासणी करू लागला त्याने पायांपासून सुरूवात केली. तळवे, मग पायांची नखे, मग पोटरी, गुडघे. काही उपयोगी किंवा सूचक दिसले, की तो फोटो काढत होता. हातांच्या मनगटाचे आणि चेहऱ्याचे निरीक्षण करण्यासाठी त्याने बराच वेळ घेतला, असे मला जाणवले. मला तेथून कधी एकदा निघतो असे झाले होते. दीर्घ प्रतिक्षेनंतर अखेर अल्फा म्हणाला,

“ठिकाय. आपण आता निघूया.”

त्याने त्या ऑपरेटरचे आभार मानले. बाहेर आल्यानंतर त्या विभागाचे इन-चार्ज असणाऱ्या डॉक्टरांशी दहा मिनिटे चर्चा केली आणि अखेर आम्ही बाहेरच्या लख्ख सूर्यप्रकाशात येऊन दाखल झालो. अल्फाचा चेहरा फारसा आशावादी दिसत नव्हता.

“कठीण आहे.” तो म्हणाला, “ बाह्य अंगावर शून्य निशाण आहेत.”

मला त्या निशाण नसण्याच्या दुःखापेक्षा शवागारातून बाहेर पडल्याचे सुख जास्त महत्त्वाचे वाटत होते. पण अल्फाचा चेहरा पाहून मला राहवले नाही.

“तुला कोणते निशाण अपेक्षित होते?” मी विचारले.

"मला त्याच्या मनगटावर किंवा चेहऱ्यावर एखादा ओरखडा जरी दिसला असता ना, तर मी आत्ता भलताच खूश असतो. या माणसाचा खून झालाय असं आपण म्हणतोय, तर त्याला पाण्यात टाकण्याआधी त्याला कोणीतरी धरलं असणार. ओरडू नये म्हणून तोंड दाबलं असणार. हात एकतर बांधले असणार किंवा पकडून ठेवले असणार. मग या सगळया उद्योगांत एखादी तरी खूण अंगावर बाकी रहायला हवी होती. हो ना?? पण महाशय अगदी कोरे करकरीत आहेत.

"मग?? आता??" मी स्वाभाविकपणे विचारले.

"सगळंच थोडं गोंधळात पाडणारं आहे." अल्फा चिंताग्रस्त चेहऱ्याने म्हणाला, " देसाईंसमोर आपण मोठ्या मोठ्या बाता करून आलोय खरं.. पण यातून काहीच मिळालं नाही, तर चांगलंच तोंडावर पडू आपण. मला खात्री आहे, की त्याचा निश्चितपणे खून झालेला आहे. पण हे पक्के करणारे पुरावेही पुरेशा प्रमाणात आपल्याला मिळायला हवेत. आता शेवटचा आणि सर्वात महत्त्वाचा भाग - ही घटना जेथे घडली, ते ठिकाण. एखाद्या रहस्याचा उलगडा करण्यात नव्वद टक्के याचा वाटा असतो. कारण गुन्हेगार सोडता गुन्ह्याचे तेच एक जिवंत साक्षीदार असते. तर, आता आपले इष्टस्थळ - काळया खणीचे तळे!!"

"ओकेऽऽ.. चलो काळया खणीचे तळे!!" मी जोरात किक मारली आणि मग आम्ही तेथून सुटलो.

खण हा तळ्यासाठी वापरला जाणारा स्थानिक शब्द. काळी खण म्हणजे दुसरे तिसरे काही नसून एक विस्तीर्ण असे साधारण अर्धा किलोमीटर व्यासाचे तळे होते. त्याला खण एवढ्यासाठी म्हणायचे, की ते दुर्लक्षित आणि कुप्रसिद्ध असे तळे होते. त्या तळ्याचा भोवतालचा भाग काटेरी झुडुपांनी व्यापला होता. आजुबाजुच्या वस्तीमधील सांडपाणी त्या तळ्यात येऊन मिसळत होते. त्या तळ्याच्या स्थिर पाण्याकडे पाहताना एक उदास अशी भावना मनात उत्पन्न होत होती. आम्ही जेव्हा त्या खणीपाशी उतरलो आणि मी दुरून त्या ठिकाणावरून नजर टाकली, त्यावेळी माझ्या मनात विचार येऊन गेला - याच्याकडे थोडे लक्ष दिले आणि काम केले, तर हे तळे निश्चितच शहरात आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरेल!!

अल्फा गाडीवरून उतरला आणि पाण्याच्या दिशेने चालू लागला. मुख्य रस्ता सोडून काही अंतरापर्यंत मातीची जमिन होती आणि मग तळ्याकडे उतार सुरू होत होता. या उताराला झाडा-झुडुपांनी आच्छादून टाकले होते. मध्ये मध्ये काही दगडधोंडेही होते. उताराच्या अखेरीस तळ्याचे पाणी सुरू होत होते. मीही सावकाशपणे अल्फाच्या पाठोपाठ निघालो आणि उताराच्या वरच्या टोकाला येऊन पोहोचलो. पोलिसांकडून आम्ही जिथे प्रेत मिळाले, ते ठिकाण जाणून घेतले होते.

“बाभळीचे मोठे झाड असेच सांगितले ना त्यांनी??” अल्फा एका जागी थबकून म्हणाला. आमच्या समोर बाभळीचे बऱ्यापैकी मोठे असे झाड होते. आजुबाजुला छोटीमोठी झुडपे होती. त्या झाडालगतच खाली झुडुपांमधून पाण्याकडे उतरून जाण्यासाठी पायवाट होती.

"इथून त्याची बॉडी बाहेर काढली होती त्यांनी." अल्फा म्हणाला, " आता आपण गृहीत धरलंय की त्याने आत्महत्या केलेली नाही. म्हणजे साहजिकच त्याला कोणीतरी तळ्यात फेकून दिलेलं असलं पाहिजे. हे जे फेकण्याचे ठिकाण आहे, तेच आपल्याला शोधून काढायचं आहे. मला खात्री आहे, की तिथे काही ना काही नक्की मिळेल."

अल्फा अज्ञात खाणाखुणांचा मागोवा घेत सगळीकडे फिरू लागला. मी नुसताच त्याच्याकडे पाहात उभा राहिलो. रस्त्याच्या कडेला जमिनीवर बरेच टायर्सचे निशाण होते. अल्फाने तिकडे दुर्लक्ष केले आणि झुडुपांवर लक्ष केंद्रित केले. कालपासून बऱ्याच गाड्या तिथे येऊन गेल्या असल्यामुळे टायर्सच्या निशाणांकडून फारशी अपेक्षा नव्हती. अल्फा बाभळीच्या झाडापासून हळूहळू खाली उतरला. त्याची नजर बाजुच्या उतारावरील दगडधोंड्यांवर होती. आमच्या पायाखालील झुडुपे बऱ्याच प्रमाणात तुडवली गेली होती आणि दगड जागेवरून सरकले होते. अर्थातच मृतदेह पाण्यातून काढताना लोकांची ये जा तेथून झाली असणार होती.

त्याने आपला मोर्चा आजुबाजुच्या झाडीवर वळवला.

"माझ्या बरोब्बर मागे ये. इकडेतिकडे अजिबात जाऊ नकोस. माझ्या पावलांवर पाऊल. समजलं??"

त्याने मागे न पाहताच मला बजावले. मी चूपचाप मान डोलावली. तो वाट सोडून अलगदपणे झाडांत शिरला. त्याने आपले भिंग काढले आणि तो जवळपास खालीच बसला. खुरट्या झाडांची पाने आणि दगड यांना अगदी नाक

टेकेल इतक्या अंतरावरून न्याहाळू लागला. या ठिकाणी कोणी आले गेले असल्यास त्याच्या खुणा मिळणे बरेच सोपे होते. कारण अशा काट्याकुट्यांच्या आणि त्यात चांगलाच तिरका असणाऱ्या उतारावर फार कोणी येत असावं, असं मला वाटत नव्हतं. त्यामुळे खुणा पुसून जाण्याची शक्यता खचितच नव्हती.

अल्फा बराच वेळ शोधत राहीला. मीही माझ्या सुमार नजरेतून काही सुगावे सापडतायत का, ते पाहत राहिलो. काही वेळ जाताच एकदम अल्फाचा आवाज आला - “थांब!!”

“काय झालं?” मी दचकलोच.

“हलू नकोस जागचा.. आहेस तिथेच थांब.” तो ओरडला. दबक्या पावलांनी पुढे जाऊन तो थेट गुडघ्यांवर बसला. त्याने तेथे खाली काहीतरी निरखून पाहण्यासाठी खूप वेळ डोके घातले. मग तसेच गुडघ्यावर रांगत आजुबाजुची जागा तपासली. दगड सरकवून पाहिले. फोटो घेतले. तसाच तो खाली तळयाकाठी गेला. तिथेही काही फोटो घेऊन आला. मग विरुद्ध दिशेने वर गेला. मी आपला आज्ञाधारक मुलासारखा एकाच जागी खिळून उभा होतो. उगाच आगाऊपणा केला आणि महत्त्वाचे निशाण मिटवले, तर अल्फाच्या शिव्या खाव्या लागल्या असत्या. म्हणून मी त्याचे मन भरेपर्यंत तसाच पोझ दिल्यासारखा उभा राहिलो. अखेर वरून अल्फाने मला हाक मारली, “प्रभू, ये वरती. आणि हो, येताना दगडांवर पाय ठेवत ये. जमिनीवर काटे आहेत.”

“हो.” मी तोल सांभाळत वरती चढून आलो.

“गुऽऽड!!” तो उत्साहाने म्हणाला, “ आता एक काम कर. गाडीपाशी जाऊन उभा रहा. मी आलोच.”

त्याच्या अचानक बदललेल्या वागण्याचा अर्थ मला ठाऊक होता. त्याला काहीतरी जबरदस्त असा पुरावा मिळाला होता.

दोन मिनिटांत तो पुन्हा वर आला. मी त्याच्या प्रज्वलित चेहऱ्याकडे पाहत विचारले,

“काय शेरलॉक होम्स.. आजच संपवून टाकताय की काय हे प्रकरण??”

तो हसला.

“छे रे!! अजून तर बराच दूर आहे मी या प्रकरणाच्या निकालापासून. पण आता आपण देसाईंसमोर तोंडावर पडणार नाही, असे तरी निदान मी ठामपणे म्हणू शकतो.” अल्फा म्हणाला, “त्या वेड्याचा खूनच झालाय प्रभू.”

त्याने मोठा श्वास घेतला. तळ्यावरून येणारी वाऱ्याची झुळूक आमच्या अंगांवर आदळली आणि त्याचबरोबर तेथील झाडांच्या पानांचा सळसळाट झाला.

“आणि हा खून घिसाडघाईने नाही, तर अतिशय थंड डोक्याने झालेला आहे.”

माझे मन सुन्न झाले होते. क्षणभर मला ते बोलणे स्विकारता आले नाही. त्या वेड्याचा भेदरलेला चेहरा माझ्या समोर आला. त्याचा थंड डोक्याने, अतिशय काळजीपूर्वक खून करण्यात यावा, इतके काय मोठे गुपित त्याला ठाऊक होते??

“तिकडे खाली उतारावर तुला काय मिळालंय?”मी अल्फाला विचारले.

“या ठिकाणावर आपल्याला प्राथमिक अंदाज बांधता येतील इतके तरी धागेदोरे मिळाले आहेत. त्याबद्दल मी तुला घरी गेल्यावर खुलासेवार सांगतो. आधी आपण आपल्या रूमवर जाऊया. जेवणाचा डबा मेसवरून घेऊन जाऊ, म्हणजे आपल्याला रूमवर जेवता जेवता निवांत बोलता येईल. तेथून मला पुढच्या मोहीमेवर जायचे आहे, जिकडे तू येण्याची गरज नाही. आता एक दोन दिवस भरपूर काम करावे लागणार आहे, असं दिसतंय.”

मला अल्फाचे अप्रूप वाटले. कोण होता तो वेडा आमच्यासाठी?? फक्त पाच मिनिटे, तेही अपघातानेच भेटलेला एक अनोळखी मनुष्य. पण त्याच्या मृत्यूचे कोडे उलगडण्यासाठी अल्फा स्वतःला झोकून देण्याची तयारी दाखवत होता. आजकाल लोक ओळखीच्या, जवळच्या लोकांसाठीही काही करत नाहीत. आणि इथे माझा मित्र एका अनोळखी व्यक्तीला न्याय मिळवून द्यायला निघाला होता. मला त्याचे कौतुक वाटले आणि अभिमानही वाटला. मी त्याच्याकडे पाहून हसलो.

“मला खात्री आहे, तुला यात लवकरात लवकर यश मिळेल.” मी म्हणालो. त्याने मान तुकवून माझे आभार मानले. आम्ही आमच्या उसन्या गाडीवर स्वार झालो आणि रूमकडे निघालो.

# 4.

उन्हाचा ताव खूपच वाढला होता. डबा घेऊन घरी येईपर्यंत आम्ही घामाने पुरते चिंब झालो होतो. रूमवर येऊन जेव्हा फॅनखाली पाच मिनिटे बसलो, तेव्हा आम्हाला स्वर्गसुख मिळाल्याचा भास झाला. थोडं फ्रेश होऊन आम्ही आमचे डबे उघडले आणि जेवणावर तुटून पडलो. जेवणाबद्दल मी एक मत बनवून ठेवलं आहे - जेवण चवदार किंवा बेचव असा काही प्रकार नसतो. असते ती तुमची भूक!! भूक नसेल, तर मिष्टान्नही तुम्हाला जाणार नाही आणि खूप भूक असेल, तर भाजी भाकरीतदेखील तुम्हाला पंचपक्वान्ने दिसतील!!

थोडा वेळ खाल्ल्यानंतर आमची भूक थोडी शमली आणि मग अल्फाने बोलण्यास सुरूवात केली,

"तुला मी एक एक गोष्ट क्रमवार सांगतो, म्हणजे माझ्या विचारशृंखलेमध्येही थोडी सुसूत्रता येईल."तो म्हणाला, "तो मनुष्य गुरुवारच्या रात्री आपल्याला भेटला आणि शनिवारी रात्री उशिरा त्याची बॉडी पाण्यावर तरंगताना आढळून आली. बुडालेल्या देहाला पाण्याच्या पृष्ठभागावर येण्यासाठी साधारणपणे एक ते दीड दिवस लागतो. याचा अर्थ त्या व्यक्तीला शुक्रवारी रात्री पाण्यात बुडवून मारण्यात आले असावे. मधला वेळ तो कुठे होता, हे आपल्याला

त्याच्या चपलांवरून निश्चितपणे सांगता आले असते; पण त्या पाण्यात भिजल्यामुळे बहुतांश खुणा पुसल्या गेल्या आहेत. पण जितक्या खुणा बाकी आहेत, त्यावरून थोडाफार अंदाज आपण नक्कीच लावू शकतो. हे फोटो पहा.”

त्याने त्याच्या मोबाईलवर काढलेले फोटो मला दाखवले.

“यांच्या तळव्यावर थोडंसं घट्ट झालेलं सिमेंट लागलं आहे. जेव्हा एखादा रस्ता नवीन बांधतात, तेव्हा त्यावरचे डांबर वाहनांच्या चाकांना चिकटू नये, म्हणून त्यावर कोरडे सिमेंट पसरवतात. ते चपलांना लागून राहू शकतं आणि त्याला थोडंसं पाणी लागलं, तर ते घट्ट होऊन बसू शकतं. म्हणजेच, आपला मित्र अशा एखाद्या ठिकाणी गेला होता, जिथे नवे रस्ते बांधणे सुरू आहे - सांगली कोल्हापूर हायवे!! शंभर फूटी रस्त्यावरून थेट पुढे गेलो, की आपण सांगली- कोल्हापूर हायवेवरच जाऊन पोहोचतो. म्हणजे आपल्याला भेटल्यावर तो सरळ चालत सांगली- कोल्हापूर हायवेवर जाऊन पोहोचला, असे म्हणायला हरकत नाही. आता हे पाणी कुठून आलं? कोल्हापूरच्या दिशेने सगळा कोरडा ओसाड प्रदेश आहे, त्यामुळे तो पुन्हा सांगलीच्या दिशेनेच आला असणार. तेथून पहिला लागतो तो मारूती चौक आणि तिथे सतत ड्रेनेजचा काहीतरी प्रॉब्लेम सुरू असतो. त्यामुळे ते पाणी चपलांना तिथंच लागलं असणार. आता तेथून पुढे हे महाशय कुठे गेले, हे काही सांगता येत नाही. कदाचित तेथील लोकांना विचारल्यावर काही माहिती मिळेल. पण हे इथेच संपत नाही. आणखी एक सूचक निशाण त्यावरती आहे.”

मी तो फोटो झूम करून पाहिला.

“याच्या एका चपलेच्या टाचेच्या बाजूला कसलेतरी काळपट निशाण आहे.”

“करेक्ट!!” अल्फा म्हणाला, “ ते निशाण पाहून मी थोडासा गोंधळात पडलो होतो. ते एखाद्या प्री-पेंट सोल्यूशनसारखे होते. लाकूड रंगवताना त्याचा वापर करतात. 'वूड स्टेन' हे त्यांचं कमर्शियल नाव. पण मला त्याबद्दल खात्री नव्हती. मग तो मुद्दा मी तात्पुरता बाजूला ठेवून दिला.

पुढे. त्याच्या शर्टाचा फोटो पहा. त्यावर मध्यभागी आडव्या रेषेत दोन-तीन निशाण आहेत - साधारण काळपट असे. हे कशामुळे तयार होऊ शकतील?? हे एखाद्या दोरखंडाचे निशाण आहेत, ज्याने खूनीने त्याला बांधले असावे.

त्यानंतर आपण गेलो शवागारात. तेथे तुला सांगितल्याप्रमाणे काहीच मिळालं नाही. आता शेवटची आशा होती, ते म्हणजे काळया खणीचे तळे.

तेथे अपेक्षेप्रमाणे बऱ्याच खाणाखुणा माझ्या नजरेस पडल्या. पहिली म्हणजे, उतारावर एका ठिकाणचे दगड त्यांच्या जागेवरून थोडेसे सरकले होते - तेही तळयाच्या दिशेने. याचा अर्थ कोणीतरी त्यावरून खाली उतरले होते. मग त्याच पट्ट्यात मी वर आणि खाली तपासणी केली. थोडी थोडी झाडेही तुडवली गेली होती. तेथे केलेल्या निरीक्षणावरून मी पुढीलप्रमाणे अनुमान काढले - नंबर एक - या खूनप्रकरणात एकापेक्षा जास्त लोकांचा समावेश आहे. याचे कारण म्हणजे, त्या उतारावरचे समांतर अंतरावरील दोन बाजूचे दगड जागेवरून सरकले आहेत. म्हणजे दोन व्यक्तींनी दोन बाजूंनी धरून त्याला पाण्याच्या दिशेने नेले असावे.

उताराच्या वरच्या अंगाला त्यांना सावध करण्यासाठी एकजण उभा असण्याचीही शक्यता आहे. म्हणजे दोन अथवा तीन लोक त्या वेळी तळयापाशी हजर होते.

नंबर दोन - या दगडांवरून खूनी व्यक्तीच उतरल्या आहेत कशावरून?? दुसरे कोणीही उतरले, तरीही ते दगड सरकणारच. त्याचे उत्तर मी ते दगड किती प्रमाणात दबले आहेत यावरून काढले आणि त्यासाठीच मी तुला वर येताना दगडांवर पाय ठेवून येण्यास सांगितले. तुझ्या वजनाने ते दगड जितके खाली दबले, त्याच्या जवळपास तिप्पट खोल ते पहिले दगड दबले गेले होते. असे का?? साहजिकच त्यावरून चालणारा जो कोणी होता, तो बरंच वजन अंगावर घेऊन चालत असावा. ते वजन म्हणजे अर्थातच आपल्या मित्राचे शरीर असणार!! शिवाय या दोन्ही व्यक्तींमधला एकजण बराच गलेलठ्ठ असावा, असाही माझा अंदाज आहे.

नंबर तीन - मी रस्त्याच्या कडेला, त्या खुणा उतारावर ज्या ठिकाणी सापडल्या, त्याच्या बरोब्बर वर टायर्सचे निशाण मिळतायत का, ते पाहिले. तेथे मला चार वेगवेगळया टायर्सचे निशाण मिळाले. एका संपूर्ण दिवसात तेथून बऱ्याच गाड्या जाणे साहजिकच आहे. पण तो भाग रस्ता सोडून बाजूला असल्याने तिकडे फार गाड्या जाणार नाहीत, अशी माझी खात्री आहे. या चारपैकी आपल्याला हवे असलेले कोणते, हे आपण नंतर पडताळून पाहू.

नंबर चार - हे सर्वात महत्त्वाचे आहे- खाली तळयापाशी मला अगदी अस्पष्ट असा बुटाचा ठसा मिळाला. ओली जमीन म्हणजे आमच्यासारख्या शोधकांचा मित्रच. आणि तळयाकाठी थोडी ओली जमीन असणे स्वाभाविकच आहे.

त्यामुळे अपेक्षेप्रमाणे अस्पष्ट का होईना, पण मला ठसा मिळाला. आता या ठशावरून मी बूट नक्कीच ओळखू शकतो आणि ते घालणारी व्यक्तीही.. !

नंबर पाच- दगडांवरती आणि काही प्रमाणात झाडांवरदेखील, मला लाकडाचा भुसा चिकटलेला आढळला. पुढचा फोटो पहा."

मी फोटो पाहिला. फारच अल्प प्रमाणात पिवळ्या रंगाचे कण दगडावर लागून राहिलेले मला दिसले.

"म्हणजे पोलीस स्टेशनमध्ये पाहिलेले चपलेवरचे डाग वुड स्टेनचेच आहेत, हे नक्की झाले. हे डाग आणि हा लाकडाचा भुसा, या दोन्हींची जर आपण सांगड घातली, तर हेच सिद्ध होते, की हा मनुष्य तळ्याकडे येण्याआधी टिंबर एरीयात कुठेतरी होता. कारण तिथे लाकूडकामाचा धंदा करणाऱ्यांची खूप दुकाने आहेत. अशा प्रकारचा भुसा तुला तिथेच मिळू शकेल. थोडक्यात काय, तर आपल्या कोड्याचे उत्तर आपल्याला टिंबर एरीयात मिळणार आहे. कारण खून करणारी व्यक्ती तिथलीच आहे. असा सगळा या प्रकरणाचा लेखाजोखा आहे!!"

अल्फाच्या निरीक्षणे ऐकून क्षणभर माझी विचारशक्तीच काम करेनाशी झाली.

"मांईंड ब्लोईंग!!" मी नकळतच उद्गारलो.

"आता पुढचे काम आहे, ते म्हणजे मिरजेच्या मेंटल हेल्थ हॉस्पिटलच्या डॉक्टरांना भेटणे.."अल्फा म्हणाला, " तेथून या वेड्याची काही माहिती मिळाली, तर टिंबर एरीयातील बरेच काम वाचेल. त्याने पाहिलेला खून कोणता आहे, हे

कळालं तर झालंच आपलं काम म्हणून समज!! मला हे प्रकरण फारच रोमांचक ठरणार, असं वाटायला लागलंय आता.”

“या प्रकरणापेक्षा तू ज्या पद्धतीने त्याचा छडा लावतो आहेस, तेच जास्त रोमांचक आहे..”मी बोललो. तो खुर्चीतून उठला.

“माझं जेवण झालं. आता मी पळायला सुरूवात करतो. तू थांब रूमवर. रात्री जेवून घे. मला किती वेळ लागेल सांगता येत नाही. मी आलो की बोलूच यावरती.”

“हो चालेल. मी बोअर होणार असं एकूणच दिसतंय. पण हरकत नाही. माझे आणखीही मित्र आहेत इथे.” मी कपाटातील पुस्तकांकडे पहात म्हणालो.

“मित्र नव्हे, गर्लफ्रेंड आहेत त्या तुझ्या!!” तो खिदळत म्हणजे म्हणाला, “ एंजॉय युवरसेल्फ!!”

अल्फा निघून गेला आणि मी एकटाच रूमवर उरलो. दुपारचा वेळ पुस्तकांसोबत घालवणं मला प्रचंड जड गेलं. माझ्या डोळयांसमोर सतत त्या वेड्याचा शवागारात पाहिलेला थंड चेहरा येत होता. कोणाचा हात असेल त्याच्या मृत्यूमागे?? एखाद्या वेड्यालाही मारण्याची वेळ यावी, असं कोणतं गुपित आणि कोणाच्या पोटात लपलेलं असावं?? या प्रश्नांची उत्तरे केवळ अल्फाच शोधू शकत होता.

रात्री उशिरा अल्फा रूमवर परतला. चेहऱ्यावरून तो थोडा चिंतातूर दिसत होता.

“जेवलास का??” मी विचारले.

“होय.. आत्ताच जेवलो. मला शंकाच होती, इतक्या रात्री मला जेवणाचे ठिकाण मिळेल की नाही. पण नशीबाने एक खानावळ सुरू होती. तेथे जेवून आलो.”

“अच्छा.” मी हातातील पुस्तके बाजूला सारत म्हणालो. अल्फाने जोरात फॅन लावला आणि त्याखाली खुर्ची टाकून तो बसला. मी थोडा वेळ जाऊ दिला आणि मग विचारले.

“तपासात काही प्रगती??”

“थोडीफार.” तो म्हणाला, “ तो मनुष्य - थांब.. आपण आता मृत व्यक्तीला 'तो वेडा', 'तो मनुष्य' म्हणणे थांबवूया. हॉस्पिटलमध्ये मला माहिती मिळाली, की त्याला तेथे सगळे 'जीवन' म्हणायचे. आपणही त्याला 'जीवन'च म्हणूया. तर हा जीवन शुक्रवारी संध्याकाळी सांगलीच्या गणपती मंदीरापाशी होता, असे मला कळाले. मारूती चौकापासून हे मंदिर जवळ आहे. म्हणजेच तो सांगली - कोल्हापूर हायवेवरून मारूती चौक आणि तेथून गणपती मंदिर अशा मार्गाने भटकला. गणपती मंदिरापासून सरळ चालत गेलास, की तू बरोबर टिंबर एरीयात जाऊन पोहोचतोस. म्हणजे टिंबर एरीयाबाबतचा आपला अंदाज खरा आहे, असे मानायला हरकत नाही. हा त्याच मार्गाने गेला असणार आणि खूनीच्या कचाट्यात अडकला असणार.

त्यानंतर मी कार्पेंटरी मध्ये वापरल्या जाणाऱ्या 'वूड स्टेन' ची चौकशी केली. आपल्या भागात सर्वसाधारणपणे तीन वेगवेगळया कंपन्यांचे वूड स्टेन्स वापरले जातात. जीवनच्या चपलेला लागलेला वूड स्टेन चांगल्या प्रतीचा आणि थोडा महाग आहे. या कंपनीचा स्टेन कोणत्या दुकानात वापरतात, याचा आता शोध घ्यायला हवाय. शिवाय त्या भागातील लाकूड वखारींमध्ये येणाऱ्या जाणाऱ्या गाड्यांवर लक्ष ठेवण्याची व्यवस्था मी करून आलोय, जेणेकरून आपल्याला त्यांच्या टायर्सचे निशाण तळयापाशी मिळालेल्या सर्व निशाणांशी जुळतात का, ते पाहता येईल.”

“चांगलंय ना मग. सर्व बाजूंनी आपण खूनीच्या जवळ पोहोचण्याचा प्रयत्न करतोय. कुठे ना कुठे तरी धागा नक्कीच जुळेल ना!!” मी म्हणालो, “ हे सर्व होऊनदेखील तुझ्या चेहऱ्यावरती तेरा का वाजलेत, हे मला समजेनासं झालंय.”

“कारण या प्रकरणात तेवढीच मोठी गोची आहे!!” अल्फा म्हणाला,” मी मिरजेच्या मेंटल हेल्थ केअर सेंटरमध्ये गेलो होतो, जेथून हा पेशंट पळाला होता. तेथे डॉक्टरांना भेटलो आणि जीवनची चौकशी केली. तेव्हा मला तेथे काहीतरी विचित्रच गोष्टी समजल्या.”

“काय समजलं तुला?”

“हा पेशंट सतरा वर्षांपूर्वी त्या हॉस्पिटलमध्ये दाखल झाला होता.. आणि तेव्हापासून तो तेथील अतिदक्षता विभागात आहे!!” अल्फा म्हणाला,” आणि त्यांचं

असं म्हणणं आहे, की गेल्या कित्येक वर्षांत हॉस्पिटलच्या आवाराबाहेर कुठेही त्याला सोडण्यात आलेलं नाहीये!!”

मी ते ऐकून चक्रावलोच.

“मग त्याने खून होताना पाहिला कधी?? आणि कुठे??”

“तुझ्याप्रमाणे मलाही असं वाटत होतं, की हा जो कोणता खून त्याने पाहिला आहे, तो काही दिवसांपूर्वी किंवा फारतर काही महिन्यांपूर्वी झाला असावा. पण मला वाटतंय, की आपली ही समजूत चुकीची आहे.”

“म्हणजे?? तुला म्हणायचंय की तो खून सतरा वर्षांपूर्वी झाला होता??” मला धक्काच बसला.

“दुसरी कोणती शक्यताच दिसत नाहीये.” अल्फा म्हणाला, “ डॉक्टर म्हणत होते, की तो पेशंट म्हणजे एक मोठीच गुंतागुंतीची केस आहे. तो आलाय तेव्हापासूनच 'मी खून होताना पाहिला आहे' असं बडबडत आहे. फार प्रयत्नांनी त्याला काही प्रमाणात नॉर्मल करण्यात त्यांनी यश मिळवलं होतं. पण मधून मधून त्याला तीव्र झटके येतच होते. गेल्या आठवड्यात तेथील सेक्युरीटी गार्डच्या एका छोट्या चुकीमुळे तो तेथून पळून जाण्यात यशस्वी झाला. थोडक्यात काय, तर आपण जीवनच्या खूनामागचं जे कारण शोधतो आहे, ते म्हणजे कदाचित सतरा वर्षांपूर्वी घडलेला एक खून आहे!!”

“माय गॉड!!” मला तर विश्वासच बसत नव्हता. अल्फाने माझ्याकडे खिन्नपणे पहात भुवया उंचावल्या.

“मग आता पुढे काय करायचं ठरवलंयस तू??”मी अल्फाला विचारले.

“सध्या तरी आपल्या मार्गाने जात रहायचं.” अल्फा खुर्चीवर बोटांनी वाजवून ताल धरत म्हणाला, “ एरवी कसं असतं, एखाद्या गुन्ह्यामागचं कारण प्रथम कळालं, की गुन्हेगाराला पकडणं सोपं होऊन जातं. पण या केसमध्ये ते कारण पहिला शोधणं शक्य वाटत नाहीये. आपल्याला प्रथम उपलब्ध पुराव्यांच्या आधारे गुन्हेगाराला पकडायला हवं. तेव्हाच ते कारण समजेल.”

“हं.. . खचितच विचित्र आहे हे..” मी म्हणालो, “ पण अल्फा, सतरा वर्षांपूर्वी घडलेल्या गुन्ह्यातील गुन्हेगाराला त्याच वेळी शिक्षा झालेली असू शकते ना?? ते प्रकरण तेव्हाच मिटले असेल कदाचित. मग तू अंधारातच चाचपडत आहेस, असंही होऊ शकतं.”

“नाही प्रभू, माझ्या मित्रा.. ते प्रकरण तेव्हाच मिटले असते, तर जीवनचा खून झालाच नसता. ते रहस्य कोणाला कधी उलगडलेलेच नसावे. आणि जीवनच्या माध्यमातून ते इतक्या वर्षांनी बाहेर पडण्याची शक्यता निर्माण झाली, म्हणून तर त्याचा खून करण्यात आला.” अल्फा ठामपणे म्हणाला, “ मी पैजेवर सांगतो प्रभू. सतरा वर्षांपूर्वी जे काही घडले, ते काहीतरी जबरदस्त असणार आहे आणि त्याच्यामागे कोणीतरी शक्तिशाली व्यक्तीचा हात असणार आहे. इतकी वर्षे एक व्यक्ती एखादे प्रकरण दडपवून ठेवू शकते, त्याचा अर्थ स्पष्टच आहे. त्या व्यक्तीच्या

हातात पैसा आहे, शक्तीही आहे. ती कोण आहे, हे शोधून काढल्याशिवाय मी शांत बसणार नाही. आत्ता अंधारात चाचपडतोय, पण ते चाचपडणेच आपल्याला अंधारातून बाहेर पडण्यासाठी मदत करणार आहे.”

“निश्चितच..” मी अल्फाला प्रोत्साहन देत म्हणालो, “ मग?? उद्याचा कार्यक्रम??”

“आखलेला आहे.” अल्फा म्हणाला, “ मी तुला एखादवेळेस मदतीसाठी फोन करून बोलावू शकतो. तुला यायला जमेल का? तुझे कॉलेज आहे ना पुन्हा उद्यापासून??”

“बिनधास्त फोन कर. सगळेजण गॅदरींगच्याच धुंदीत असणारेत आणखी दोन दिवस. त्यामुळे माझ्या मदतीची चिंता नको.”

“गुड.” अल्फाचा चेहरा उजळला, “चला आता झोपूया. उद्या झोपेचे वांधे होण्याची दाट शक्यता मला वाटतेय. अरे वा!! माझाही बेड झोपण्यासाठी तयार करून ठेवला आहेस की काय तू?? क्या बात है!! मित्र असावा तर तुझ्यासारखा बघ प्रभू.. गुड नाईट.. !!”

तो आल्यापासून झोपेसाठी आसुसलेला दिसत होता. तो बेडवर पडताच झोपी गेला. मीही सावकाशपणे दिवा बंद केला आणि माझ्या बेडकडे निघालो.

*

# 5.

सकाळी मला जाग आली, ती अल्फाच्या फोनच्या आवाजाने. मी सावकाशपणे डोळे उघडून पाहिलं. मला वाटलं, की माझ्याप्रमाणेच अल्फाही डोळे चोळत उठणार आणि जांभई देत फोन उचलून 'हॅलो' म्हणणार. पण जेव्हा अंघोळ करून, नीटनेटके कपडे घालून बाहेर जाण्याच्या तयारीत असलेल्या अल्फाने फोन उचलला, तेव्हा खऱ्या अर्थाने माझी झोप उडाली.

“हॅलो..” तो बोलला, “हो मीच बोलतोय.. चेक झाले का??.. ओह.. नाही नाही.. ऐका तरी माझं.. पोस्ट मॉर्टमचे रिपोर्ट येईपर्यंत थोडा धीर धरा.. . हो मला पूर्ण खात्री आहे.. . शंभर टक्के.. . हो हो.. . ठिक आहे.. हॅव अ गूड डे!!”

फोन ठेवताना त्याचा चेहरा त्रासलेला होता.

“कोण रे??” मी विचारले.

“इन्स्पेक्टर देसाई!!” तो उत्तरला.

“काय म्हणत होते ते??”

“ 'कपडे आणि चपलांवर कोणतेही फिंगरप्रिंट्स मिळाले नाहीत. तू आता आमच्या डिपार्टमेंटच्या लोकांना त्रास द्यायचं बंद करतोस की नाही??'“ अल्फाने त्यांची नक्कल करून दाखवली. मी हसलो.

“ देसाईंकडे एखादे काम समजून घेण्याची क्षमता आहे. पण त्यावर कृती करण्याची अक्कल मात्र नाही!!” तो म्हणाला, “ काहीपण म्हण प्रभू. गुन्हेगार जबरदस्त चालाख आहे. आणि त्यामुळेच मला हे प्रकरण हाताळताना जाम मजा येतेय!! चल, मी निघतो. फोन सुरू ठेव..”

तो कुठे जातोय, हे मी विचारण्याआधीच रूमचा दरवाजा बंदही झाला होता. पण तो टिंबर एरीयातच गेला असावा, असे मला खात्रीशीरपणे वाटत होते. मी आवरून कॉलेजमध्ये गेलो. दिवसभर माझे लक्ष अल्फाच्या फोनकडेच होते. पण दिवसभर काही त्याचा फोन आला नाही. संध्याकाळी मी रूमवर येतो न येतो, तोच माझा फोन खणाणला - अल्फा.

“प्रभू, अर्ध्या तासात टिंबर एरीयात पोहोचू शकतोस का?? कॉलेज कॉर्नरच्या चौकात मी तुझी वाट पहात थांबलो आहे.”

मी हो म्हणताच त्याने फोन ठेवून दिला. मी घड्याळात पाहिले. सहा वाजत आले होते. मावळत्या सूर्याची किरणे रूमच्या खिडकीवर पडत होती आणि त्यांमुळे आमची रूम लाल रंगाने न्हाऊन निघाली होती. मी पटापट आवरले आणि स्टॉपवरून रिक्षा पकडली. माझी उत्सुकता आता शिगेला पोहोचली होती. रिक्षा

थेट टिंबर एरीयात नेऊन थांबली. बाजूलाच एका टपरीपाशी अल्फा उभा होता. त्याने मी दिसताच हात केला आणि माझ्यापाशी आला.

“वेळेत आलास.” अल्फा म्हणाला, “आता ऐक. मी दिवसभर फिरून या भागाची खडानखडा माहिती मिळवली आहे. येथील प्रत्येक वखारीत जाऊन मी बऱ्यापैकी माहिती गोळा करून आलोय. आपण बांधलेल्या अंदाजांवरून तीन लाकूड वखारी अशा आहेत, जिथे माझी नजर खिळून राहिली आहे. मला खात्री आहे, की यांपैकी एका ठिकाणीच जीवनला त्या रात्री आणले गेले होते. मला असे, का वाटते, ते नंतर सांगतो. आत्ता फक्त एवढंच लक्षात ठेव, की आपण टिंबर एरीयातील वखारींचा सर्व्हे करण्यासाठी आलो आहोत आणि आपल्याला वखारीच्या मालकाला भेटायचे आहे. तू फक्त वही पेन हातात घेऊन काहीतरी लिहील्यासारखं कर.”

“कॉपीड, सर.” मी मिश्कीलपणे म्हणालो. तो हसला. आम्ही निघणार, तेवढ्यात त्याचा फोन वाजला.

“देसाई!!” अल्फाने फोन उचलला, “ बोला सर. पोस्ट मॉर्टममध्ये मृत व्यक्तीच्या शरीरात क्लोरोफॉर्मचा अंश मिळाला हेच सांगण्यासाठी फोन केला होता ना??.. मला कसं कळालं, ते जाऊ द्या.. आता यावरून हे सिद्ध होतंय, की मरण्याआधी मृत व्यक्तीला क्लोरोफॉर्म वापरून बेशुद्ध करण्यात आलं होतं आणि याचाच अर्थ असा,की त्या व्यक्तीचा खून झालेला आहे.. . मी तुम्हाला एक मेल केलाय, ज्यामध्ये मी या केसचं संपूर्ण स्पष्टीकरण लिहिलेलं आहे त्यावरून एकदा नजर फिरवा, म्हणजे तुम्हाला या प्रकरणाचा गाभा पटकन दृष्टीस पडेल.. . आणि

हो, वाचून झाल्यानंतर थेट टिंबर एरीयात या. आपला गुन्हेगार तेथेच दडलेला आहे. मी लोकेशन पाठवेन.. . हो मी इथेच आहे.. ठेवतो."

आम्ही चालू लागलो होतो.

"मला ठाऊक होतं, की देसाईंची ट्यूब उशीराच पेटणार." अल्फा जोराने पावले टाकतच म्हणाला, " तळयाच्या काठी कोणतेही झटपट झाल्याचे निशाण नव्हते. म्हणजेच जीवनला पाण्यात टाकण्याआधी बेशुद्ध केलं गेलं असणार - म्हणजेच पोस्ट मॉर्टममध्ये क्लोरोफॉर्म मिळणं नक्की. चला, शेवटच्या क्षणी का होईना, पण पोलीस आपल्या पाठीशी उभे राहिले. हे पहा आलोच आपण."

आम्ही पहिल्या वखारीत शिरलो. गेटमधून थेट समोर ऑफिसची छोटी खोली होती आणि डाव्या बाजूला मोकळी जागा होती, जिथे लाकडाचे ओंडके रचून ठेवले होते. आम्ही ऑफिसमध्ये शिरलो. तेथे एक लठ्ठ, गोरा आणि काहीसा बुटका माणूस खुर्चीवर बसून काहीतरी लिहीत होता. आम्ही आत शिरताच त्याने आमच्याकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले.

"नमस्कार. आम्ही मॅनेजमेंटचे विद्यार्थी आहोत आणि टिंबर एरीयाचा सर्व्हे करत आहोत. सकाळी येऊन गेलो, पण तुम्ही भेटला नाही. तुम्हाला काही प्रश्न विचारायचे आहेत."

त्याच्या चेहऱ्यावर त्रासाची एक लकेर उमटली.

“बसा.” नाखुशीनेच तो म्हणाला. आम्ही टेबलासमोरील खुर्चीवर जाऊन बसलो. अल्फाने माझ्या हातात एक छोटी वही दिली आणि आपल्या खिशातून एक प्रश्नावली काढली. हे सर्व करताना अल्फाची बारीक नजर त्या खोलीवरून फिरत होती, हे मला जाणवले. त्याने त्या माणसाला एकामागून एक प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. तो माणूस अतिशय निरुत्साहीपणे आणि तुटकपणे त्याच्या प्रश्नांची उत्तरे देत होता. अल्फाने मधुनच कागद खाली पाडला. मग अचानक त्याचा फोन वाजला. त्याने ती प्रश्नावली माझ्या हातात दिली आणि तो खिडकीपाशी फोनवर बोलत गेला. वखारीचा मालक त्याचे हे सगळे उद्योग हताशपणे पहात होता. अखेर थोडा वेळ आम्हाला सहन केल्यानंतर शेवटी तो म्हणाला,

“बरं तुम्ही आता लवकर आवरतं घेतलं तर बरं होईल. मला दुसरी महत्त्वाची कामं आहेत.”

“हो झालंच आमचं. अजून काही प्रश्न आहेत, पण ते काही फार महत्त्वाचे नाहीयेत. तुमचा कामाचा वेळ घेतला, त्याबद्दल सॉरी. निघतो आम्ही.”

अल्फाने त्याचं दुकान गुंडाळलं आणि आम्ही तेथून सटकलो. त्या माणसाच्या चेहऱ्यावर 'कोण हे मूर्ख येऊन गेले' असे भाव मला दिसले.

अल्फाने आतमध्ये काय पाहिले, हे विचारायला मला सवडच मिळाली नाही. कारण बाहेर पडताच अल्फा तरातरा पुढच्या वखारीकडे निघाला. थोडे अंतर चालून गेल्यावर अल्फा एका गेटमधून आत शिरला आणि मीही त्याच्या मागोमाग गेलो. येथे गेटला लागूनच ऑफिस होते आणि मागील बाजूला लाकडे ठेवण्याची

जागा होती. आम्ही त्या खोलीतून आत डोकावलो. आतमधे दोन माणसे बसली होती. ते दोघेही साधारण पन्नाशीतले होते, मध्यम बांध्याचे होते आणि दिसायला बऱ्यापैकी सारखेच होते. ते दोघेही भाऊ असावेत, असा मी अंदाज बांधला. आम्ही सर्व्हेचे कारण सांगताच त्यांनी आपले काम बाजूला ठेवले आणि आम्हाला बसून मोकळेपणाने प्रश्न विचारण्यास सांगितले. त्यांच्या हसतमुख चेहऱ्यामुळे आणि दिलखुलास बोलण्यामुळे मला बरे वाटले, पण त्याउलट अल्फाच्या चेहऱ्यावर थोडी निराशा दिसली. त्याने त्यांना मोजकेच प्रश्न विचारले आणि तेथून काढता पाय घेतला. त्याला हवे असलेले अजूनही त्याला मिळाले नाहीये , हे माझ्या लक्षात आले.

आम्ही बाहेर पडलो, तेव्हा अंधार पडायला लागला होता. आम्ही आणखी पुढे चालत गेलो. मुख्य रस्त्यापासून आम्ही आता बरेच आत आलो होतो. इथे रस्त्यावर खूप अंतर ठेवून दिवे असल्यामुळे तो भाग तसा अंधारलेलाच होता. शिवाय रहदारीही तुरळकच होती. पाच मिनिटे चालल्यानंतर आम्ही एका वखारीपाशी येऊन उभे राहिलो. त्या वखारीला लाकडी कुंपण होते आणि ती खुपच जुनाट वाटत होती. टिंबर एरीयाच्या एका कोपऱ्यात ती वसली होती. रस्त्यावरील दिव्याचा प्रकाश सोडता आजुबाजुला थोडा अंधारच होता. या वखारीतले ऑफिसही गेटपासून बरेच आत होते. गेटपाशी उभा राहून अल्फाने त्या ऑफिसकडे एक नजर टाकली.

“बेटा इथे तर तू मला सापडायलाच हवा आहेस..” अल्फा पुटपुटला. आम्ही आत प्रवेश केला. गेटपर्यंत पोहोचतो, तोपर्यंत आतून दोघंजण बाहेर येत होते. बहुधा ते लोक ऑफिस बंद करण्याच्या तयारीत होते.

"कोण रे तुम्ही??" त्यांतल्या एकाने विचारले. परसदारात अंधार असल्यामुळे आम्ही त्यांचे चेहरे पाहू शकत नव्हतो.

"शुभसंध्या, सर. आम्ही मॅनेजमेंट कॉलेजचे विद्यार्थी आहोत. एका प्रोजेक्टसाठी आम्ही या भागातील वखारींचा सर्व्हे करत आहोत. तुमची दहा मिनिटे हवी आहेत." खरोखरीच एखादा मॅनेजमेंटचा विद्यार्थी वाटावा, अशी सभ्यता दर्शवित अल्फा म्हणाला.

"हे बघा. आम्ही आता ऑफिस बंद करतोय. तुम्हाला जे काही विचारायचे असेल, ते उद्या सकाळी येऊन इथल्या कामगारांना विचारा. जा आता." अल्फाच्या सभ्यतेएवढेच उद्धट उत्तर आम्हाला मिळाले.

"कामगारांना आज सकाळीच भेटून झालंय. तुम्ही संध्याकाळी इकडे येता हे कळालं, म्हणून थांबलो. थोडंसं सहकार्य करा. मोठा प्रोजेक्ट आहे." अल्फा म्हणाला.

"आत्ता नाही. संध्याकाळी फार वेळ आम्ही येथे थांबत नसतो. उद्या थोडं लवकर या. पाच वाजता." तो पठ्ठ्या काही ऐकायला तयार होईना. पण अल्फाही चांगलाच हट्टी होता.

"उद्या कॉलेजमध्ये रिपोर्ट द्यायचा आहे. प्लीज सर. घड्याळ लावा हवं तर. पाच मिनिटांपेक्षा जास्त वेळ घेणार नाही."

"बरं विचार पटापट. सांगतो. लवकर आवरून टाकू." तो माणूस म्हणाला. आम्हाला ऑफिसच्या आत घेण्याची त्यांची अजिबात इच्छा नव्हती, हे सरळसरळ दिसत होते.

"सर, या रिपोर्टमध्ये आम्ही या भागातील सर्वात मोठ्या अशा तीन वखारी निवडल्या आहेत, ज्यामधील एक तुमची आहे. आपली प्रश्नोत्तरे व्यवस्थित झाली, तर आम्ही रिपोर्टही नीट पब्लिश करू शकू. त्यातून होणाऱ्या मार्केटिंगचा फायदा तुम्हालाच होणार आहे. त्यामुळे आतमध्ये बसून आपण हा कार्यक्रम करू शकलो, तर फार बरं होईल. शिवाय माझ्या मित्राला टिप्पणीही पद्धतशीरपणे लिहिता येतील."

त्या दोघांनी एकमेकांकडे क्षणभर पाहिले, मानेने काही इशारे केले आणि त्यातला एकजण म्हणाला,

"ठिकाय. या आत."

अल्फाने मारलेला बाण बरोबर निशाणावर बसला आणि अखेर आम्हाला त्या ऑफिसमध्ये प्रवेश मिळाला.

ऑफिसही बाहेरच्या कुंपणाप्रमाणेच जुनाट होते. कोणी ऑफिसच्या स्थितीकडे फारसे लक्ष देत नसावे. खिडकीतून आणि दरवाजातून आत आलेला लाकडाचा भुसा पायांत पसरला होता. कसलातरी विचित्र कुबट वास तेथे भरून राहिला होता. लाकडी फळ्या टाकून वरचे छत बनवले होते आणि त्याला आधार देण्यासाठी एक खांब त्या खोलीमध्ये उभा होता. आम्ही खुर्चीवर बसलो. आमच्या

समोर दोन जण होते. त्यातला एकजण काळया वर्णाचा, भरघोस दाढी-मिशी असणारा, हातांत कडे घातलेला आणि धिप्पाड असा होता. तो एखाद्या तमिळ फिल्मचा खलनायक शोभला असता. दुसरा थोडासा सडपातळ, चापून बसवलेल्या केसांचा, थोडा उजळ, पण चेहऱ्यावरून चालाख वाटेल, असा होता.

“सुरू करूया?” अल्फाने विचारले. त्याचे पाणीदार डोळे समाधानाने चमकत होते. मी मनातून समजून गेलो. मासा गळाला लागला होता.

“आपलं नाव सांगाल का??”

“मी विश्वजित साठे आणि हा असिफ मुल्ला.” दोघांतील धिप्पाड असणारा मनुष्य म्हणाला.

“तुम्ही या वखारीचे मालक आहात??” अल्फा.

“ नाही. आम्ही येथील मॅनेजर आहोत. मी वखारीचा कारभार पाहतो आणि हा आर्थिक व्यवहार पाहतो.”

“वखारीचे मालक कोण आहेत??”

“ सलीम शेख. मोठे असामी आहेत. नाव ऐकलं असेलच तुम्ही.” मुल्ला म्हणाला.

“सॉरी, पण नाही ऐकलं.” अल्फा निर्विकारपणे म्हणाला, “ मला सांगा, तुम्ही या ऑफिसचा वापर कशासाठी करता??”

"कशासाठी म्हणजे?? कामासाठी!!" साठे म्हणाला. आता त्याच्या आवाजात थोडी चीड आली होती.

"अच्छा. आणि ऑफिसमधील या खांबाचा उपयोग होतो का तुम्हाला कधी??"

तो प्रश्न ऐकून साठे जागेवरून उठलाच. त्याचा चेहरा रागाने लालबुंद झाला होता.

"हे असले फालतू प्रश्न विचारण्यासाठी थांबायला लावलंय का तुम्ही आम्हाला?? आत्ताच्या आत्ता इथून चालते व्हा, नाहीतर एकेकाला उचलून फेकून देईन!!"

ते ऐकून माझ्या छातीत धस्स झाले. तो माणूस इतका धिप्पाड होता, की मनात आणलं, तर तो खरंच आम्हा दोघांना उचलून फेकू शकला असता. मी अल्फाकडे पाहिले. त्याचा चेहरा मात्र मघासारखाच शांत आणि निश्चल होता.

"जसं तुम्ही शुक्रवारच्या रात्री एका माणसाला काळया खणीच्या तळयात फेकलं होतं, तसंच का??" अल्फा थंडपणे म्हणाला. ते वाक्य ऐकून मात्र त्या दोघांच्याही चेहऱ्यावरचे भाव क्षणात बदलले. भीतीयुक्त नजरेने त्यांनी एकमेकांकडे पाहिले.

"कुठले तळे? कोणाला फेकलं?? काय बडबडताय तुम्ही??" मुल्ला सटपटून म्हणाला.

" सांगतो ना. अगदी व्यवस्थित पहिल्यापासून सांगतो." अल्फा खुर्चीवरून पुढे होत म्हणाला, "सर्वप्रथम तुमच्या मालकाने तुम्हाला एका माणसाला पकडायला सांगितले. तो एक भटका आणि वेडसर माणूस होता. तुम्ही कोणाला कळणार नाही, अशा बेताने त्याला रस्त्यावरून उचलले आणि 'कामासाठी' वापरल्या जाणाऱ्या या ऑफिसमध्ये आणले. त्याला या खांबाला बांधून ठेवले. मग तुमचा बॉस शेखचे त्याच्यासोबत काही खाजगी बोलणे झाले आणि त्याने तुम्हाला त्या माणसाला मारून टाकण्यास सांगितले. तुम्ही त्या व्यक्तीला बेशुद्ध केले आणि रात्री उशिरा गाडीतून नेऊन काळया खणीच्या तळयात फेकून दिले. विषय संपला. तुमच्याकडे यापेक्षा वेगळं काही सांगण्यासारखं असेल, तर सांगा."

"ए खुळखुळया.. जास्त वाजू नकोस!! कशावरून बोलतोयस हे तू?? काय पुरावा आहे तुझ्याकडे??" साठे गुरकावला.

"हे बुटाचे ठसे पहा." अल्फाने आपल्या मोबाईलवरचा फोटो दाखवला, " तळयाच्या काठाशी मिळाले आहेत. तुमच्या बुटांशी अगदी तंतोतंत जुळतील. शिवाय मृत व्यक्तीच्या चपलांना लागलेला लाकडाचा भुसा आणि आपल्या पायांत आत्ता पसरलेला भुसा सारखाच आहे, हे सिद्ध करणेही फार अवघड नाही. याहीपुढे, त्याच्या शर्टावरील काळपट डाग हे कोपऱ्यात पडलेल्या त्या दोरखंडाचे आहेत ज्याने तुम्ही त्याला बांधले होते, हे एखादा मूर्खही सांगू शकेल. आणखी हवेत का पुरावे तुम्हाला??"

"नको. इतके पुरावे पुरेसे आहेत." मुल्ला संथपणे आपल्या जागेवरून उठत म्हणाला. तो दरवाजाकडे चालत गेला आणि त्याने आतून दरवाजा लावून घेतला, "

बरेच पुरावे आपण मागे सोडले, नाही का साठे?? पण हरकत नाही. आम्ही पुन्हा ही चूक करणार नाही. तुमच्या खूनाचा एकही पुरावा मागे राहणार नाही, याची आम्ही हमी देतो."

माझ्या काळजाचा ठोकाच चुकला. समोर उभारलेल्या साठेने आमच्याकडे पाहत कुत्सित हास्य केले. आम्हा दोघांसाठी तो एकटाच पुरेसा होता. मुल्ला दाराला कडी लावणार, तितक्यातच तो दरवाजा धाडकन परत मागे आला आणि भिंतीवर आपटला. आम्हा चौघांच्याही नजरा तिकडे वळल्या. बाहेरून 'दबंग' स्टाईल एंट्री करत इन्स्पेक्टर देसाई खोलीत प्रकट झाले.

"महाशय, थोडं आमच्याकडेही लक्ष द्या!!" ते म्हणाले. पोलीसांना पाहताच ते दोघेही भिऊन मागे सरकले."केव्हापासून बाहेर निमंत्रणाची वाट पाहतोय आम्ही. आम्हाला आत बोलवायचं सोडून दरवाजा लावून घ्यायला निघाला होता होय!!" देसाई म्हणाले, " जाधव, बेड्या ठोका यांना."

त्यांच्या सोबत आलेल्या पोलीसांनी साठे आणि मुल्लाला जेरबंद केले.

"आम्ही.. आम्ही काही केलेलं नाही.. शेखसाहेबांनी आम्हाला तसं करायला सांगितलं होतं.. आम्हाला सोडा.. प्लीज साहेब.." हातांत बेड्या पडल्यावर मात्र त्या दोघांचं अवसान पुरतं गळालं.

“ शेखसाहेबाने शेण खायला सांगितलं, तर खाशील काय रे ए जाड्या!!” आयतेच सावज हातात सापडल्यामुळे देसाई रंगात आले होते, “तुझा साहेब कुठे राहतो सांग. त्यालाही खडी फोडायला पाठवायचं आहे.”

“ते मागच्या गल्लीतच राहतात. त्यांना विचारा हवं तर.. आमचा काहीच दोष नाहीये यात.. .” ते दोघेही देसाईंच्या हातापाया पडू लागले. पण त्यांना न जुमानता देसाईंनी त्यांना गाडीत बसवून पोलीस ठाण्यात पाठवून दिले.

“तू म्हणजे खरंच कमाल आहेस अल्फा!!” अल्फाकडे पाहत देसाई म्हणाले, “ तुझा मेल वाचला मी. किती सूक्ष्म निरिक्षणावरून तू गुन्हेगारांचा अचूक माग काढलास!! तुझ्या बुद्धीला खरंच दाद द्यायला हवी..”

“धन्यवाद, देसाईसाहेब.. या स्तुतीबद्दलही आणि वेळेत इथे येऊन आम्हाला वाचवल्याबद्दलही!!” अल्फा म्हणाला.

“अरे ते काही फार मोठं काम नव्हतं. तू जे लोकेशन पाठवलंस, त्याच्या आधारेच मी इथपर्यंत येऊन पोहोचलो. बरं, आता घाई करूया आणि त्या शेखला अटक करूया. म्हणजे आपलं काम फत्ते. . खरंतर या शेखला मी ओळखतो. बडा व्यापारी आहे तो. बोलण्या - चालण्यावरून सभ्य दिसतो. तो हा असा काही कारभार करून ठेवेल, असं वाटलं नव्हतं. असो. चला.”

आम्ही देसाईंच्या गाडीत बसलो आणि शेखच्या घराकडे निघालो. मी माझे कुतूहल शमविण्यासाठी अल्फाला प्रश्न विचारला,

“अल्फा, टिंबर एरीयातील इतक्या साऱ्या वखारींतून तू बरोबर या तीन कशा निवडल्यास? कशावरून तुला वाटलं, की यांपैकी एक कोणीतरी निश्चितपणे गुन्हेगार आहे??”

“हं.. थोडंसं अवघड काम होतं खरं हे.” अल्फा सुस्कारा टाकत म्हणाला, “जीवनच्या चपलाला लागलेलं वूड स्टेन कोणकोणत्या ठिकाणी वापरतात, हे प्रथम मी पाहिलं. ते थोडंसं महाग आणि भारी प्रतीचं आहे आणि या पूर्ण भागातील साधारण चाळीस दुकानांपैकी आठ ठिकाणीच हे उपलब्ध आहे. त्यामुळे बाकीच्यांचा विचार करण्याची गरज नाही. या आठ वखारींमध्ये एखादी बंदीस्त जागा आहे का, हे मी पाहिले, जेणेकरून जीवनला पकडून आणल्यानंतर त्याला कोणालाही न दिसता डांबून ठेवता येईल. या आठमधील काहींना ऑफिस होते, तर काहींना नव्हते. ज्यांना नव्हते, त्यांचा विचार सोडून दिला आणि बाकींवर मी माझे लक्ष केंद्रित केले. जीवनला एखाद्या ऑफिसच्या खोलीतच बांधून ठेवले गेले असणार होते. आता या ऑफिसेसमध्ये जाऊन मी तेथील मॅनेजर अथवा मालकांना भेटलो आणि त्यांच्या पायांत मला हवे असलेले बूट दिसतायत का, ते पाहिले. मला जे भेटले, त्यांच्या पायांत असे बूट मला दिसले नाहीत आणि तीन वखारी अशा होत्या, ज्यांचे मॅनेजर मला भेटलेच नाहीत. आता साहजिकच, या तीनपैकी एक कोणीतरी खूनी असायलाच पाहिजे होता आणि त्याच्या पायांत ते बूट मिळायला हवे होते. ती वखार म्हणजे आपल्या शोधातील शेवटची वखार निघाली.”

अल्फाच्या उत्तराने केवळ मीच नाही, तर देसाईदेखील प्रभावित झाले.

“अल्फा, आमच्या शोधकार्यात तुला प्रत्येकवेळी समाविष्ट करून घ्यायला पाहिजे, असं मला वाटू लागलंय. वाघमारे साहेब उगाच तुझ्यावर आग पाखडत असतात. असा तंत्रशुद्ध विचार करणाऱ्याची आम्हाला खरंच गरज आहे.”

“मला तुम्हाला मदत करायला नेहमीच आवडेल, सर!!” अल्फा खुष होऊन म्हणाला. आम्ही शेखच्या बंगल्यापाशी पोहोचलो. बऱ्यापैकी मोठा आणि नवीन बांधणीचा बंगला होता तो. आम्ही दरवाजापाशी गेलो आणि बेल वाजवली. आतून काहीच प्रतिसाद आला नाही. अल्फाने पुन्हा एकदा बेल वाजवली. पुढच्याच क्षणी दार उघडले आणि आतमधून एक माणूस येऊन आमच्या अंगावर जवळपास पडलाच.

“स.. स्.. साहेब..” तो अस्पष्टपणे म्हणाला. त्या अनपेक्षित स्वागताने आम्ही सगळेच क्षणभर बावचळून गेलो.

“त्याची शुद्ध हरपतेय.. कोणीतरी पाणी आणा!!” अल्फा ओरडला. आमच्यासोबत असलेल्या हवालदाराने आतमध्ये जाऊन पाणी आणले आणि त्याच्या तोंडावर शिंपडले.

“ठिक वाटतंय का तुला?? काय झालं??” देसाई चिंतातूर होऊन म्हणाले. त्याने आपला हात हळूवार उचलत वरच्या मजल्याच्या दिशेने दाखवला. हॉलमधूनच वरती जाण्यासाठी पायऱ्या होत्या. आम्ही धावतच वरच्या मजल्यावर जाऊन पोहोचलो. डाव्या बाजूला एकच खोली होती, जिचे दार उघडे होते. आम्ही आतमध्ये पाहिले आणि जागीच खिळून राहिलो.

आतमध्ये एक पन्नाशीतला माणूस गळफास लावून लटकला होता!!

माझ्या डोळ्यांसमोर क्षणभर अंधारीच आली. देसाई आणि अल्फा आतमध्ये गेले. त्यांचा आवाजही मला कमी कमी ऐकू येत होता. मी मागे सरकून भिंतीचा आधार घेतला, तेव्हा माझे डोके थोडेसे ताळ्यावर आले.

“प्रभू.. प्रभू!! प्रभव??” मला जाणवले, की अल्फा मला हाक मारत होता.

“हां बोल..” मी माझ्या कपाळावरचा घाम पुसत म्हणालो.

“पोलीस ठाण्यात फोन लाव आणि त्यांना पटकन इकडे यायला सांग. आणि तू इथे थांबू नकोस. खाली वाट पहा. आम्ही थोड्या वेळात येतो.”

मला तेथे क्षणभरही थांबण्याची इच्छा नव्हती. मी लगेच खाली आलो, पोलीस स्टेशनला फोन लावला आणि खालीच हॉलमध्ये वाट पहात बसलो.

माझे डोके सुन्न झाले होते. वरती लटकलेल्या माणसाचा चेहरा वारंवार डोळ्यांसमोर येत होता आणि त्यामुळे डोके गरगरत होते. तो माणूस म्हणजेच सलीम शेख होता का?? आणि तो खाली धडपडत आलेला माणूस कोण होता मग?? वरती नक्की काय घडले होते?? शेखने गळफास लावून आत्महत्या केली होती का??

मी फार विचार करू शकलो नाही. माझ्या मेंदूची विचार करण्याची क्षमताच नष्ट झाली होती जणू. सुमारे अर्धा तास मी तसाच बसून राहिलो. अंगात विलक्षण थकवा जाणवत होता. असे मला आधी कधी झाले नव्हते. कदाचित माझ्या

मनाला ते दृश्य अगदीच अनपेक्षित असावे आणि त्यामुळे बसलेल्या मानसिक धक्क्यामुळे माझे संतुलन बिघडले असावे.

दरम्यानच्या वेळेत पोलीस वरती गेले. वरून खाली आले. बऱ्याच हालचाली झाल्या. साधारण तासभर गेला आणि अल्फा खाली आला.

“सॉरी प्रभू.. मघाशी फार बोलू शकलो नाही. तुला बरं वाटतंय ना? मघाशी तुला चक्कर येत असल्यासारखं मला वाटलं.”

“हो मी ठिक आहे. ते दृश्य अचानक समोर आल्यामुळे एकदम डोळ्यांसमोर अंधारी आली रे.” मी म्हणालो, “काय झालंय वरती??”

“सलीम शेखने आपल्या खोलीत गळफास लावून आत्महत्या केली आहे.” अल्फा हताशपणे म्हणाला, “ खाली धडपडत आला तो त्याचा घरगडी होता. त्यानेच सर्वप्रथम मृतदेहाला पाहिले आहे.”

“आत्महत्येचं कारण कळालं का??” मी विचारले. अल्फाने पॉलिथीनच्या लहानशा पिशवीत ठेवलेली चिठ्ठी मला दाखवली. त्यावर लिहिले होते –

*काळ्या खणीत रविवारी पहाटे सापडलेल्या मनोरुग्णाच्या मृत्यूला मी जबाबदार आहे. त्याने आत्महत्या केली नसून मी माझ्या हस्तकांकरवे त्याचा खून केला आहे. यामागे काही व्यक्तिगत कारणे आहेत, जी मी जगाला सांगू इच्छित नाही आणि या घटनेमुळे*

*होणाऱ्या मानहानीला तोंड देण्याचे बळही माझ्यात नाही. त्यामुळे पोलीसांना माझा माग लागला आहे, हे कळताच मी आत्महत्येचा निर्णय घेतला आहे. माझ्या मृत्यूसाठी कोणालाही जबाबदार धरू नये.*

*सलीम शेख*

मी ते वाचून अल्फाकडे पाहिले. तो खूपच निराश दिसत होता.

“खूपच टोकाचा निर्णय घेतला या शेखने.” तो म्हणाला, “शेख गेला आणि त्याच्यासोबत जीवनच्या खुनामागचे कारणही गेले.”

मीदेखील तो मजकूर वाचून हळहळलो.

“आता काय करणार आहे आपण?” मी अल्फाला विचारले.

“मला इथे थांबून आणखी थोडा तपास करायचा आहे. जोपर्यंत मला खात्री होत नाही, की शेखने आत्महत्याच केली आहे, तोपर्यंत मला चैन पडणार नाही.”

“म्हणजे?? त्याच्या मृत्यूमागे आणखीही काही आहे, असं तुला म्हणायचंय का??” मी भुवया उंचावल्या.

“ते आता तपास केल्यानंतरच कळेल.” अल्फा म्हणाला,” तू एक काम कर. वरती कांबळे म्हणून हवालदार आहेत, जे थोड्या वेळाने विश्रामबागला जायला

निघणार आहेत. मी त्यांना तुला सोबत घेऊन जायला सांगितले आहे. ते तुला रूमवर सोडतील. तू जाऊन जेव आणि विश्रांती घे. फारच दमलेला दिसतोयस तू. माझी वाट पाहू नकोस. मला उशीर होईल यायला.”

“ठिक आहे.” मी म्हणालो. अल्फाने माझा निरोप घेतला आणि तो पुन्हा वरती गेला. मी खालीच कांबळेंची वाट पहात थांबलो. मला खरेच विश्रांतीची गरज होती. तेथील मरणप्राय वातावरणातून कधी एकदा बाहेर पडतो, असे मला झाले होते. कांबळे खाली येईपर्यंत मी माझे मन रमविण्यासाठी हॉलमधले फोटो पाहू लागलो.

हॉलमध्ये शेखचे बरेच फोटो होते. स्टेजवरती सत्कार स्वीकारतानाचे, उद्घाटन करतानाचे, नेत्यांसोबत हसऱ्या मुद्रेतले. देसाईंनी त्यांच्याबद्दल जे सांगितले होते, ते फोटो पाहिल्यानंतर मला लगेच पटले. प्रथम पाहणाऱ्याला शेख अतिशय सभ्य माणूस वाटला असता. तो खून वगैरे काही करू शकेल, असे त्याच्या चेहऱ्यावरून वाटत नव्हते.

भिंतीवर ओळीने लावलेले फोटो पाहता पाहता मी कपाटापशी आलो. ते एक लाकडी कपाट होते आणि त्याचा एक ड्रॉवर अर्धवट उघडा होता. त्यातून एक ब्लॅक अँड व्हाईट फोटो बाहेर डोकावत होता. मी तो हातात घेणे योग्य आहे का, याचा क्षणभर विचार केला आणि लगेच पुन्हा ठेवून देऊ, या विचाराने तो फोटो मी हातात घेतला.

तो एक धुळकटलेला, फाटायला आलेला एक जुनाट फोटो होता. त्यामध्ये नीटनेटका पोषाख केलेले चौघे उमदे पुरूष उभे होते. सर्वजण सव्वीस - सत्तावीस वर्षांचे वाटत होते. त्यातील एकाला तर मी लगेच ओळखले. तो तरूण सलीम शेख होता. त्याच्या बाजूला उभ्या असलेल्या व्यक्तीकडे मी निरखून पाहिले. याला मी निश्चितच पाहिले होते - अगदी अलिकडेच. त्याच्या चेहऱ्याची ठेवण पाहून मला एकदम तो चेहरा आठवला - हा तोच चेहरा होता जो मी शवागारात पाहिला होता - जीवन!!

माझ्या छातीचे ठोके वाढल्याचे मला जाणवले. शेख आणि जीवन यांच्यात खूपच जुने संबंध होते, हे या फोटोवरून दिसून येत होतं. मी त्या फोटोतले आणखी कोण ओळखीचे दिसतेय का, ते पाहू लागलो. फोटोत सर्वात उजवीकडे उभारलेला मनुष्य थोडा प्रौढ वाटत होता आणि वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या कडेवर एक वर्षभर वयाचा छोटा मुलगाही होता. त्या मुलाकडे पाहून मी चमकलो. मला का कोणास ठाऊक, पण असे वाटले, की त्या मुलालाही मी कुठेतरी पाहिलंय. ते डोळे माझ्या अगदी रोजच्या पाहण्यातले आहेत, असं मला वाटू लागलं. पण त्याला नक्की कुठे पाहिलंय, हे मात्र काही केल्या आठवेना. मी या प्रकरणातील हरएक व्यक्तीचा त्या मुलाच्या डोळ्यांशी संबंध लावून पाहिला. पण नाही!! मला तो कोण होता, हे निश्चित करणे शक्य झाले नाही.

मी तो फोटो पाहत असताना मागून मला हाक ऐकू आली. मी तो फोटो चलाखीने लपवला आणि मागे वळलो. ते कांबळे होते.

“तुला घरी सोडायचे आहे ना?” त्यांनी विचारले.

“अं हो.. निघायचं का??” मी विचारले.

“हो निघूया. बराच उशीर झालाय.”

आम्ही त्यांच्या गाडीवरून रूमकडे निघालो. तो फोटो माझ्या खिशातच होता. पूर्ण प्रवासात मी त्या छोट्या मुलाचाच विचार करत होतो. माझी स्मरणशक्ती इतकी कमकुवत कशी काय असू शकते?? मला तो मुलगा कोण आहे, हे का ओळखता येत नाहीये???

मी मेसपाशीच उतरलो आणि जेवण करून रूमवर आलो. रात्रीचे दहा वाजायला आले होते. मी आमच्या खोलीतील खुर्ची दिव्यापाशी ओढली आणि तो फोटो माझ्या समोर ठेवला. ते डोळे!! जणू तो माझा बालपणीचा हरवलेला मित्र होता!! हा फोटो या केसचे कोडे सोडवण्यात खूपच महत्त्वाची भूमिका बजावणार होता, हे मला कळत होतं. बस्स तो मुलगा कोण हे आठवायला हवं होतं. बराच वेळ गेला. मी आता जवळपास हट्ट्लाच पेटलो होतो. हे एका गणितासारखं होतं. तुम्ही शेवटच्या पायरीपर्यंत आला आहात. तुम्हाला कोणता फॉर्म्युला वापरायचा, हेही ठाऊक आहे. पण तुमची आकडेमोड चुकतेय आणि उत्तर येत नाहीये!!

खूप वेळ त्या फोटोकडे एकटक पाहिल्यानंतर माझ्या मनात एक अविश्वसनीय विचार तरळून गेला. पहिला तर मी स्वतःलाच झटकले. छे छे!! हे कसं काय असू शकतं.. . पण मला खात्री करून घ्यावीशी वाटू लागली. अखेर बळ एकवटून मी जागेवरून उठलो. माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले होते. मी

अल्फाच्या कपाटापशी गेलो आणि त्यातून त्याचा लहानपणीचा अल्बम काढला. कापऱ्या हातांनी मी त्याची पाने पलटली. त्यामध्ये त्याचे लहानपणीचे अनाथाश्रमातील फोटो होते. मी शेखच्या घरातून आणलेला फोटो त्या अल्बमच्या बाजूला ठेवला आणि दोन्ही फोटो एकदम पाहिले. क्षणभर मला वाटलं, की माझं हृदय थांबून गेलंय.. .

तो अल्फा होता.. .

मी तो अल्बम आणि फोटो दोन्ही बाजूला टाकले आणि मिनिटभर बेडवर बसलो. मला स्वतःला शांत करणं फारच अवघड होत होतं. हे कसं शक्य होतं?? मी पुन्हा पुन्हा ते फोटो पाहिले. तो अल्फाच होता. या लोकांशी त्याचा काय संबंध होता? ते खूप जुन्या फोटोत एकत्र कसे काय?? अल्फाला कडेवर घेऊन उभे असलेले त्याचे वडील होते का?? आणि या सगळ्याची अल्फाला काही कल्पना होती का??

विचार करून करून माझे डोके दुखायला लागले. आम्ही समजत होतो, की आम्ही जीवनच्या खूनाचा रहस्यभेद केला आहे. गर्द अंधारात प्रकाश टाकत सत्य शोधले आहे.. .

पण तो आमचा फार मोठा गैरसमज होता.

हे तर अंधारातील पहिले पाऊल होते.. . !!

***

*समाप्त *

*अल्फाने काळ्या खणीच्या तळ्यातील मृत्यूचे कोडे तर सोडवले ; पण त्यातून नव्या कोड्यांना तोंड फुटणार आहे. काळाच्या पडद्यामागे अनेक रहस्ये झाकली गेलेली आहेत, जी या प्रकरणातून अनपेक्षितपणे बाहेर येणार आहेत आणि सुरू होणार आहे एक चित्तथरारक, जीवघेण्या साहसांची मालिका.. .*

***प्रभवला मिळालेल्या जुन्या फोटोमधील रहस्ये अल्फाच्या पुढच्या कथेत लवकरच उलगडणार आहेत.***

***नक्की वाचा - 'डिटेक्टिव्ह अल्फा आणि मृत्यूचे संदेश'***

***हे पुस्तक पुढील महिन्यात www.bookganga.com च्या ई-बुक विभागात उपलब्ध होईल.***

डिटेक्टीव्ह अल्फ़ा हा येत्या काळातील

मराठीतील सर्वात हिट डिटेक्टिव्ह कथा असणार आहे.

पुढील पुस्तकांसाठी आणि या पुस्तकावर आपल्या प्रतिक्रिया देण्यासाठी



संपर्क करा

सौरभ वागळे

'निसर्ग' प्लाझा, सांगलीवाडी,

सांगली.

फोन : 8983234042

ईमेल : sourabhwagale@yahoo. com

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.